सं. क्र. १४१३

# वसुधा

( काव्यकथा )

कवि — अ. श्री. भवाळकर
बी. ए., बी. कॉम्.
एल्‌एल्., बी

REFBK-0010040
REFBK-0010040

# वसुधा




कवि:- अ. श्री. भवाळकर

# वसुधा

(काव्यकथा)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 23539 दिः 31/54
क्रमांक 1813 नोंः दिः 30/1/54

REFBK-0010040

REFBK-0010040

कवि— अ. श्री. भवाळकर
बी. ए., बी. कॉम्.
एल्एल्., बी.

90080

प्रकाशिका :
सौ. प्रतिभा भवाळकर
बी. ए. एम्. एड्.
१३, क्षत्रिय भुवन,
सदाशिव स्ट्रीट, गिरगांव, मुंबई ४

• • •

सर्व हक्क स्वाधीन

• • •

प्रथमावृत्ति १९५८

• • •

मुद्रक :
श्री. द. ग. गपचूप
श्री शिवाजी प्रिंटिंग वर्क्स
४९५/४९६ शनिवार पेठ, पुणें २

१०५८

परमपूज्य संत तुकाराममहाराज
यांचे गुरु श्री केशव चैतन्य स्वामी
यांचे समाधीस समर्पण

# इत इतः

आजचा जमाना हा लघुतम आणि आत्मकेंद्रित काव्याचा आहे. काव्याचें क्षेत्र आज बहुतांशीं स्वानुभूतीच्या अभिव्यक्तीपुरतें मर्यादित झालें आहे. त्यांत कथा-कथनास स्थान उरलेलें दिसत नाहीं. तें कार्य आजची लघुकथा चांगल्या प्रकारें करीत आहे. अलिकडील काव्येतिहास पाहिला तर आपल्या भावगीतरचनेनें काव्य प्रान्तात निश्चित असें स्थान मिळविलेल्या लब्धप्रतिष्ठ कवींनींच दीर्घ कथात्मक काव्य-लेखनाचे प्रयोग करून पाहावे अशी स्थिति असल्याचें दिसतें. त्यांचेहि या स्वरूपाचे प्रयोग शुद्ध काव्यदृष्टीनें गौणच ठरतात.

अशा स्थितींत एखाद्या दीर्घ अथवा लघुकथेच्या द्वारें चांगल्या प्रकारें चित्रित करतां येण्यासारख्या विषयावर काव्य लिहावयास कवि कां प्रवृत्त होतात तें खरो-खर कवींनींच स्पष्ट करावयास हवें. गद्य माध्यमांत निवेदनाला अमर्याद स्वातंत्र्य आणि लवचिकपणा लाभतो. तें स्वातंत्र्य व त्यामुळें परिणामनिर्मितीला मिळणारें साहाय्य पद्याचें माध्यम स्वीकारणाऱ्या कवीला मिळूं शकत नाहींत ही गोष्ट सर्वांना मान्य होण्यासारखी आहे. शब्दांची निवड, तपशिलाचा भरणा, स्वाभाविक बोलीची योजना, संवादसुलभता इत्यादि अनेक सोयी सोडून देऊन वृत्तानें बांधलेली व बहुधा यमकांनीं अधिक अडचणींची झालेली अशी काव्यरचना करावी असें कवींस कां वाटतें, तें त्यांच्या वंशास गेल्यावांचून समजणें कठीण आहे. पद्याचें आकर्षण इतकें आहे काय कीं त्याच्यापायीं एवढा खटाटोप करण्यासहि कवींनी तयार व्हावें ? तशांत या दीर्घकथात्मक काव्यास योजिलेलें पद्यहि विशेष गेय असतें असें नाहीं. बहुधा साकी, हरिभगिनी, आर्या, पादाकुलक अशा मर्यादित गेयता असणाऱ्या पद्यप्रकारांचाच आश्रय त्यांत केलेला असतो. गद्यापेक्षां पद्यास अधिक बांधेसूदपणा असतो, तें अधिक चिरस्थायी असतें, तें लवकर स्मृत्यारूढ होतें, त्यांत अलंकरणक्षमता अधिक असते हे विचार कथाकाव्यरचनेकडे कवीला आकृष्ट करतात हें स्पष्टीकरण पुरेसें होऊं शकेल काय ? कीं यापेक्षां कांहीं खोल, गूढ व आंतर असें कांहीं कारण असतें ?

ही तात्त्विक विचारमाला येथें स्थगित करून प्रस्तुत काव्याकडेच आपल्याला वळलें पाहिजे. श्री. भवाळकरांची ‘ वसुधा ’ ही एक नायिकाप्रधान काव्यकथा आहे. या कथेंत मुख्य कथनीय विषय आहे, तो या नायिकेचें नैतिक पतन हा आहे. नायिकेचा पति विश्राम हा एक वैमानिक होता, व तो विमानाच्या अपघातांत निधन पावला. पुत्रशोकाच्या आघातानें तिचा सासराहि लौकरच दिवंगत झाला. सासर-माहेरचा आधार नसलेल्या अवस्थेमध्यें पतीचा मित्र निशिकान्त याच्या आधारानें आपल्या स्वतःचें शिक्षण व आपल्या मुलाचें संगोपन तिनें चालविलें होतें. अशा स्थितींत एके दिवशीं संध्याकाळीं निशिकान्ताच्या निवासस्थानीं गेली असतां ती त्याच्या प्रेमपूर्तीचा विषय स्वतःस होऊं देते. परंतु लगेच तिला आपल्या अपराधीपणाची जाणीव होते, व ती तेथून बहुधा प्राणत्याग करण्याच्या विचारानें निघून जाते. तथापि आपल्या मुलाच्या संगोपन-रक्षणाच्या जबाबदारीच्या जाणिवेनें, निशिकान्ताबरोबर विवाह न करतां, केवळ अपत्यविषयक कर्तव्यभावनेनें जीवन कंठीत राहते

वर दिलेल्या शब्दांत सांगितलेली ही पतनाची कथा नायिकेबद्दल सहानुभूति बहुधा निर्माण करूं शकणार नाहीं. परंतु श्री. भवाळकरांनीं आपल्या या मानसकन्येचें चित्रण इतक्या सहृदयतेनें व वात्सल्यभावनेनें केलें आहे कीं कोणीहि रसिक वाचक तिला क्षमा केल्यावांचून राहणार नाहीं. ‘ स्वतः निर्दोषी असेल, त्यानेंच तिला दगड मारण्यास हात उचलावा ’ अशा खिस्तवचनाचाहि आधार याकरितां घ्यावा लागत नाहीं. किंबहुना हें तिचें पतनहि आकाशांतून पतन पावणाऱ्या तारकेप्रमाणें वेधक वाटावें अशी योजना-रचना श्री. भवाळकरांनीं केलेली आहे. ‘ रम्याणां विकृतिरपि श्रियं तनोति ’ असा प्रत्यय या ठिकाणीं येतो. ही कथा पतनाची असली तरी सर्व काव्यभर एक प्रकारचें सात्त्विक वातावरण पसरलेलें दिसतें. ज्या निशिकांतामुळें हें पतन घडलें, तो तर त्या क्षणापर्यंत मूर्तिमान संयमच आहे. आपल्या मित्राबरोबर वसुधेचा विवाह झाल्यापासून पत्नीविषयक आपल्या कल्पना तिच्या ठिकाणीं पूर्ण होतात असें त्याला दिसून आलें होतें. पण त्याबाबतींत नीतीस असंमत असें कोणतेंहि वर्तन त्यानें केलें नव्हतें. आपल्या मित्राच्या हयातींतच नव्हे, त्या नंतरहि आपल्या मनांतील भावना त्यानें कोणालाच व्यक्त करून दाखविल्या नव्हत्या. फक्त आपल्या विश्वासू दैनंदिनीलाच तो आपलें मनोगत व्यक्त करून दाखवी. या दैनंदिनीनेंच त्याच्या गैरहजेरींत एक

दिवस वसुधेला त्याचें अंतरंग उघड करून दाखविलें आणि त्याच दिवशीं अगदीं अनपेक्षितपणें या दोन जीवांचें मीलन आणि पतन झालें. हें सारें अगदीं स्वाभाविकपणें झाल्याचें व म्हणून समाजाच्या रोषापेक्षां सहानुभूतीलाच पात्र असल्याचें चित्र वाचकाच्या मनावर ठसविण्याचें अवघड असें काम श्री. भवाळकरांनीं चांगलेंच साधलें आहे. परंतु काव्यन्यायापेक्षां व्यावहारिक कठोर नैतिक न्याय ज्यांना अधिक मान्य असतो अशांच्या भावनांची पूर्तीहि त्यांनीं साधलेली आहे. पतनप्रसंगानंतर आपल्या नैतिक अपराधाची जाणीव होऊन वसुधा तें स्थान लगेच सोडून जाते. पण जाण्यापूर्वीं आपल्या मुलाला निशिकांताच्या हातीं निरवून आपण अखेरचा मार्ग स्वीकारीत असल्याचें चिठ्ठींत लिहून ठेवून जाते. त्यामुळें निशिकांत घाबरून जाऊन तिच्या शोधार्थ घाईघाइनें सायकलवरून निघतो. त्या घाईत अपघातानें जखमी होऊन पडल्यामुळें त्याला इस्पितळांत नेण्यांत येतें. इकडे वसुधा घरीं येऊन पाहते, तों मैत्रिणीकडे गेलेला मुलगा आजारी होऊन घरीं आलेला. अशा स्थितींत त्याला टाकून जाणें तिला शक्य झालें नाहीं. निशिकांताच्या आजारीपणांत त्याच्यावर प्रेम करणाऱ्या तिच्या मैत्रिणीनें — रजनीनें — त्याची जिवापाड शुश्रूषा केली. कृतज्ञतेनें व वसुधेच्या इच्छेखातर त्यानें रजनीशीं विवाह केला व एकंदर शेवट गोड झाला असेंच म्हणावयास हरकत नाहीं.

हें सारें स्वाभाविक झालें आहे असें वाचकांना वाटावें अशीच सबंध कथानकाची रचना कवीनें केली आहे. वसुधेचें वैधव्य तिच्या पतीच्या अपघाती मृत्यूनें आलें खरें. वैमानिकाला अपघातानें मृत्यु यावा ही गोष्ट स्वाभाविकच नाहीं काय ? निराश्रित विधवेस तिच्या पतीच्या मृत्यूनंतर त्याच्या मित्रानें आधार द्यावा हेंहि स्वाभाविकच नाहीं काय ? या सहाय्यामुळें वसुधेच्या मनांत कृतज्ञतेची भावना निर्माण होणें हेंच स्वाभाविक नाहीं काय ? केलेल्या सहायाचा उल्लेखहि न करणाऱ्या, त्याचा मोबदला न मागणाऱ्या सद्‌गुणसंपन्न अशा तरुणाबद्दल केवळ कृतज्ञतेपेक्षांहि अधिक स्नेहभावना वसुधेच्या मनांत निर्माण झाल्यास तें अस्वाभाविक आहे काय ? लोकांमध्यें होणाऱ्या कुजबुजीमुळें त्या कुजबुजीस कारण व्हावें असे विचार तिच्या मनांत, मागाहून कां होईना, पण यावे हें अस्वाभाविक कसें ठरेल ! आणि मग एके दिवशीं अगदींच अनपेक्षितपणें त्याची खासगी दैनंदिनी पाहावयाला मिळून आपल्यावरील त्याचें प्रेम स्पष्ट होऊन भारावून गेलेल्या मनःस्थितींत त्याच क्षणीं त्यानें केलेल्या प्रेमयाचनेचा प्रतिकार तिला करतां आला

नाहीं हेंहि अस्वाभाविक आहे काय ? कोणाहि सहृदयास निशिकांत आणि वसुधा यांपैकीं कोणासहि अक्षम्यापराधी म्हणवणार नाहीं. ' बलवान् इंद्रियग्रामः विद्वांसमपि कर्षति ' असेच उद्गार त्याच्या तोंडून निघतील.

काव्यामधील या मुख्य प्रसंगाखेरीज इतर प्रसंग असे या कथेंत नाहींत. परंतु एकंदर कथासूत्रांत अनेक घटनांचें निवेदन आणि अखेरचें पर्यवसान घडून येण्याची आवश्यक ती योजना कवीनें केलेली आहे. नायिकेच्या मैत्रिणीची योजना त्या दृष्टीनें त्यास पुष्कळच उपयोगी पडली आहे. त्यामुळें शेवटचें अर्ध-रुचिर पर्यवसान शक्य होतें एवढेंच नव्हे तर तिचा मुलगा कांहीं दिवस आपल्या या ' मावशी 'कडे गेल्यामुळेंच तिला ' त्या ' दिवशीं निशिकान्ताकडे जरा उशिरानेंहि जाणें शक्य झालें होतें. वसुधेच्या वैधव्यप्रसंगाआधींच कथानकांत तिचा प्रवेश, वाटेंतच झालेला निशिकान्ताचा परिचय व त्याच्याविषयीं निर्माण झालेलें प्रेम इत्यादि गोष्टी या कथेचें अखेरचें पर्यवसान स्वाभाविक वाटण्यास पोषक ठरतात. एकंदर कथानकांत केवळ योगायोगासारखी वाटणारी एकच घटना आहे व ती म्हणजे पतन प्रसंगाच्या रात्रींच पहाटेस तिच्या मुलाचें आजारी पडून घरीं परत येणें ही होय. हा योगायोग खराच, परंतु शक्यतेच्या कोटींतून बाहेर काढला पाहिजे असा मात्र नाहीं.

असें हें वास्तव, आणि तरीहि वेधक ठरावें असें कथानक काव्य त्मशैलीनें सांगण्याचें काम खरोखर सोपें नाहीं, तें सांगण्याकरितां कवीनें आर्या या जुन्या मोरोपंती मात्रावृत्ताचा आश्रय केलेला आहे. आधुनिक मराठी कवितेंत तें फारसें योजलेलें दिसत नाहीं. कवि चंद्रशेखरांनीं आपल्या ' काय हो चमत्कार ! ' या लहानशा कथाकाव्यांत त्याचा उपयोग केला आहे, तो विशेष प्रसिद्ध आहे. त्याची स्मृति प्रस्तुत काव्य वाचतांना मधून मधून होते. विशेषतः कवीनें स्वतःच मध्यें कथेंतील पात्रांना उद्देशून कांहीं विचार प्रकट करणें ही लकब या चंद्रशेखर-काव्यामध्येंहि दिसते. चंद्रशेखर हे भाषाप्रभु व प्रासादिक शैलीकरितां प्रसिद्ध आहेत. त्यांचाच आदर्श या बाबतींत कवीनें डोळ्यापुढें कळत वा नकळत ठेवलेला दिसतो, आणि याबाबतींत त्यानें चांगलेंच यश मिळविलेलें दिसतें. सबंध कवितेंत भाषेची प्रसन्नता व रचनेची शुद्धता या दोन्हीं गोष्टी सतत उपस्थित असलेल्या दिसतात. पण मोरोपंती आर्यावृत्त म्हणजे संयमाचें प्रतीक आहे. त्यांतील यमकाचें बंधन आणि विशिष्ट गणमात्रायोजना हीं भावनेच्या मुक्त,

अनिर्बंध अशा आविष्कारास आळा घालतात असें मला वाटतें. त्यामुळें या काव्यांत भावनाविष्कारास संयमाचें बंधन घातल्याचा परिणाम वाचकांच्या मनावर होतो. कवीची प्रकृतीहि संयमवादी असावी असें वाटतें. नायक नायिकांच्या उत्कट शृंगार-प्रसंगवर्णतांतहि कवीनें संयम सोडलेला नाहीं, पण त्यांचें मीलन हें उत्कटत्वांतून घडल्याचेंहि त्यानें सूचकतेनें सांगितलें आहे. इतरत्रहि नायिकेबद्दलची त्याची आपुलकी भरपूर व्यक्त होऊनहि तिचा अतिरेक त्यानें दाखविला नाहीं. संयमाचें हें वातावरण हा या काव्याचा एक विशेष आहे असेंहि म्हणतां येईल.

कोणत्याहि कथेंत कथानकाइतकेंच व्यक्तिदर्शनाला महत्त्व असतें. प्रस्तुत कथाकाव्यांतील व्यक्तींचें स्वभावचित्र संपूर्ण, रेखीव व सुव्यक्त झालेलें आहे. नायिकेचा साधा, सरळ, गंभीर, प्रेमळ असा स्वभाव, तिच्या मैत्रिणीची खेळकर, उतावीळ घायकुती, पण अधिक कर्तृत्वसंपन्न अशी प्रकृति, तिच्या पतीची साहसी, खिलाडू व पौरुषप्रधान राजस वृत्ति, निशिकान्ताची बुद्धिप्रधान, शांत-गंभीर, संयमी, सदभिरुचि व सदाचार यांनीं विशिष्ट अशी सात्त्विक प्रकृति यांचें साम्य-विरोधानें कवीनें केलेलें वर्णन व्यक्तिदर्शनाच्या दृष्टीनें फार उपकारक झालेलें आहे. वस्तुतः वसुधा आणि निशिकान्त ( यालाच नायक म्हणणें उचित होईल ) हींच एकमेकांस अनुरूप होतीं असा परिणाम वाचकाच्या मनावर होण्यास व म्हणून त्यांचें परस्पराकर्षण योग्य वाटण्यास त्याचा फार उपयोग होत आहे. परंतु नियतीची इच्छा योग्यायोग्य आणि अनुरूप-अननरूप ह्यांचा विचार करीत नाहीं, व म्हणूनच वसुधेचा विवाह विश्रामाबरोबर झाला व अगदींच अनपेक्षित नसलेलें वैधव्य येऊन पुढील प्रसंगांतून तिला जावें लागलें. नियतीइतकीच कविप्रतिभाहि कठोरहृदयी असते कीं काय असेंहि केव्हां केव्हां वाटतें. कारण याच कथेंत वसुधानिशिकान्तांचा पुनर्विवाह कवीनें लावून दिला असता, तर त्याबद्दल कवीस समाजानें दोष दिला असता असें नाहीं. पण तसें झाल्याचें सांगितलें असतें, तर विशेष कांहीं सांगितलें गेलें नसतें, कथेंतील मैत्रिणीचें अस्तित्व व्यर्थ ठरलें असतें व कोणास ठाऊक, कवीला माहीत असलेल्या प्रत्यक्षासहि तें विरोधी ठरलें असतें.

पद्यामध्यें कथा सांगण्याचें काम खरोखर अवघड असतें. त्यांत तपशीलाचा अतिरेक करतां येत नाहीं. पण तो सांगितल्यावांचून भागत नाहीं. निसर्गवर्णनें त्याला शोभा देतात, परंतु त्यांचें स्थान गौणच ठेवावें लागतें. कल्पनाविलास हा

त्याचें आकर्षण वाढवितो, परंतु कथा आणि व्यक्तिदर्शन यांवर त्याला कुरघोडी करतां येत नाहीं. विनोद त्याला लज्जत आणतो. परंतु त्यापलीकडे त्याला जातां येत नाहीं. श्री. भवाळकरांनीं हीं पथ्यें चांगलीं पाळल्याचें ठिकठिकाणीं दिसून येतें. वसुधेच्या सौंदर्याचें वर्णन (खंड १), वसुधा-विश्राम यांचा मर्यादशील प्रणय (खंड २), वसुधेला पडलेलें भविष्यसूचक स्वप्न (खंड ५), नातू व आजोबा यांच्यामधील खेळाचें वर्णन (खंड ६), आजोबांचे जीवननदीच्या पैलतीराकडे लागलेले डोळे (खंड ७), रजनीचा मोकळा व उतावळा स्वभाव (खंड ११–१२–१५), वसुधेच्या मुलाचा अवखळपणा (खंड २१), निशिकान्ताचें चमत्कारिक वाटेल इतकें संयमी वर्तन (खंड २२), वसुधेचें निशिकान्ताच्या घरीं जाऊन त्याच्या दैनंदिनीचें वाचन (खंड २७) वसुधा आणि निशिकान्त यांचा प्रसंग (खंड २८), इत्यादि भाग कवीनें पाल्हाळ न लावतां संयमानें व सूचकतेनें चित्रित केलेले आहेत. या सर्वांमध्यें कवीची परिश्रमशीलता, अभिरुचि, संपन्नता, कथनाची हातोटी हे गुण प्रकर्षानें प्रकट झाले आहेत. व त्याबद्दल कवि अभिनंदनास पात्र आहे.

श्री. भवाळकर यांनीं बुद्धिपुरस्सर कवितेचा आज एक अल्पक्षुण्ण असलेला मार्ग पत्करलेला होता. त्या मार्गानें जाण्याचें धैर्य व चिकाटी हीं त्यांनीं भरपूर प्रमाणांत प्रकट केलीं आहेत व 'प्रारब्धस्य अंतगमनम्' हें दुसरें बुद्धिलक्षणहि आज या काव्याच्या प्रकाशनानें त्यांनीं आचरणांत आणलें आहे. याबद्दल त्यांना धन्यवाद द्यावयास हवेत. अर्वाचीन मराठी कवितेमधील सामाजिक खंडकाव्याच्या दालनांत त्यांनीं एक लक्षणीय भर घातली आहे असा अभिप्राय मराठी काव्येतिहासकाराला द्यावा लागेल, मग घाईंत असणारा आजचा काव्यरसिक कांहींहि म्हणो.

म्युनिसिपल कॉलनी, पुणें ४.
ता. ३०-११-१९५७

रा. श्री. जोग

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम २३५३६ वि: ३८२
क्रमांक १५७३ नों: दि: ३०।८।७५

# रसिकांस प्रणाम—

कथाकाव्याविषयीं सर्वसाधारणपणें अनास्था असल्याची जाणीव असल्यामुळें ' वसुधा ' ही काव्यकथा मराठी रसिक वाचकांस सादर करण्याचें साहस करण्यापूर्वी ' आपरितोषात् विदुषाम् ' या न्यायानें मराठींतील वाङ्मयक्षेत्रांत ज्यांना मानाचें स्थान आहे व जे काव्यशास्त्रावर अधिकारी आहेत अशा कांहीं थोर साहित्यिकांना व परीक्षकांना मी माझी प्रस्तुत काव्यकथा वाचावयास देऊन त्यावर त्यांचा अभिप्राय प्रदर्शित करण्याची त्यांना विनंति केली. माझ्या विनंतीस मान देऊन, प्रा. श्री. म. माटे, डॉ. के. ना. वाटवे, कविवर्य यशवंत, प्रा. न. र. फाटक व प्रा. श्री. ना. बनहट्टी यांनीं आपले लेखी अभिप्राय व्यक्त करून मला उपकृत केलें आहे.

विशेषतः प्राध्यापक रा. श्री. जोग यांनीं हें काव्य आस्थापूर्वक वाचून त्याला प्रस्तावना लिहून दिली याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहें. त्यांनीं व कांहीं वर्षांपूर्वी प्रा. श्री. म. माटे यांनीं हें काव्य प्रकाशित करण्यास प्रोत्साहन दिलें नसतें तर आणखी कांहीं काळ हें काव्य अंधारांतच राहिलें असतें. शिवाय ' रोहिणी ' मासिकाचे संपादक श्री. वसंतराव कागे यांनीं ही काव्यकथा वाचून रोहिणीच्या दिवाळी अंकांत ती प्रसिद्ध करण्याची इच्छा प्रदर्शित केली व त्यामुळें १९५७ च्या रोहिणीच्या दिवाळी अंकांत ही काव्यकथा प्रथम प्रसिद्ध झाली. आतां ती पुस्तकरूपानें बाहेर येत आहे. मराठी रसिक वाचक ही काव्यकथा आस्थापूर्वक वाचून तिचें योग्य तें मूल्यमापन करतीलच.

प्रस्तुत काव्यकथा आर्यावृत्तांत लिहिली आहे. आर्येतील लज्जत काय आहे हें मोरोपंत वाचल्याशिवाय समजणार नाहीं. मोरोपंतांच्या दुर्बोध रचनेमुळें

वाचक फार तर अभ्यासू वृत्तीनें मोरोपंत वाचावयास घेतो. तथापि मनोरंजनासाठीं त्याकडे वळावयास कोणी धजत नाहीं. त्यामुळें व आजकालच्या काव्यरचनेस मात्रावृत्ताचें वावडें झाल्यामुळें एका लालित्यपूर्ण वृत्तास मराठी रसिक वाचक पारखा झाला आहे. त्यांची अल्पशी सेवा या काव्याचें द्वारें घडली तर या कथाकाव्याचें प्रसिद्धीकरण सफल झालें असें होईल.

काव्याचा छंद मला लहानपणापासून आहे व काव्यरचनेची उमेदवारीहि मीं बरीच केली आहे. तथापि हिणकस कांहींहि प्रसिद्ध करावयाचें नाहीं असा निश्चय असल्यामुळें आजवर प्रसिद्धीच्या वाटेला गेलों नाहीं. आजवर केवळ पानें-फुलें गोळा केलीं, पण आतां मात्र --

*झाली गुंफुनि माला, आतां अर्पण असोच रसिकाला,*
*मुजराहि हाच माझा तुजसि महाराष्ट्र-शारदे, पहिला!*

— अ. श्री. भवाळकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप
अनुक्रम 23453 दि.
क्रमांक 1893 नों. दि. 301
90080

# वसुधा

## १

‘ हो सावधान मंगल शुभमंगल सर्वदा सकल ठायीं, ’
वाजत वधूवर घरा – खग आले प्रेमपंथ-अनुयायी.
ती कुलवधू, तसा तो कुलवर ‘ विश्रामधाम ’ सदनांत,
लोकमतें बहु तादृश कमलेंहि उणीच शोभति सरांत.
दृष्ट न लागो म्हणती कोणी या दंपतीस क्रौंचसम,
नांदोत नितांत सुखें, वाढो उभयांतलें सदा प्रेम.
बहु साहसी युवक तो वैमानिक नामवंत विश्राम,
कणखर शरीर, कोमल मन त्याचें जनमुखावरी नाम.
वसुधेस कुणी म्हणती, ‘ बाई, तूं भाग्यशील, पतिहि तुझा,
कुलदीपक टिळकांचा लाखामाजीं असा मिळायाचा. ’

‘ विश्राम ’ हकारोनी स्वपिता सांगे कधीं तयास हित,
‘ बा गोमटी वधू तव सुलक्षणी आपुल्या कुलास हित. ’
वसुधा बापूजींची स्नुषा नव्हे, लाडकी असे लेक,
ज्यानें त्यानें तिजला वानावें हाच करुनि उल्लेख.
बहु गुणवती तशी ती विनयवती, दशशतांत रूपवती,
मोहक तनु नाजुक हनु, जणुं मौक्तिक-मालिकाच दंततती !
वक्राग्र नासिका नहि, हंस चतुर मौक्तिकाशना आला;
कीं तो चोरिल माला म्हणुनि मिटुनि घेइ काय अधराला ?
ते हांसरे टपोरे कृष्ण-नयन शोभती अलि-द्वयसे;
फुलले गुलाब मग ते कपोलसानिध्य सोडतील कसे ?
रेखीव वक्र भुवया, मनहारी विपुल अलक-संभार,
तनुवर आभरणांचा शृंगार उगाच वाटतो भार !
ऐशी मनोज्ञ जाया म्हणुनी विश्राम धन्यता मानी,
गुणिनी स्नुषा म्हणोनी गुरुजनही हो मनांत अभिमानी !

¤ ¤ ¤

## २

आज विवाहा झालें साल पुरें शीघ्र ते दिवस गेले,
कुजबुजती हळु कोणी कीं वसुधेला अहो दिवस गेले.
त्यानें ती सुषमा मग अधिकाधिक रुचिर येतसे दिसुनी,
विश्रामाला वाटे क्षणभरि जाऊं नये हिला त्यजुनी.

दिन आजचा सुमंगल, परतुनि विश्राम ये घरा त्वरित,
वसुधा बसली होती काशिदा काढीत, काळही क्रमित.
भ्रमलें परि मन कोठें ? प्रमदे, तव हरपलें कसें भान ?
मागें विश्राम उभा छपुनि, तरी ये कसें न समजून ?
ती बघ लाली आली अनुरागाची तुझ्या मुखीं सुमुखी,
सविता मागुनि येतां पूर्वदिशा सहज होय रक्तमुखी.
घेणार नयन मिटुनी वसुधेचे तो हळू निजकरांत,
येउनि चाहूल म्हणे,–' इःश कसे आज परत इतक्यांत ! '
' सोडायचे गडे मज अवचित येइल कुणीतरी आंत, '
निसटायास झटे तों दिसले बापू समोर दारांत.
आधीच लाजरी ती अधोवदन कांहिंशी उभी राही,
तेव्हां वाटे वेली फलभारें वाकली असे का ही ?
आरक्त राग देई अधिकाधिक चारुता मुखश्रीस,
जाणो दिन–रजनी वा अरुण–उषा भेटतात उभयांस !
बापूजी कुतुकानें बघुनी गेले निघून लवलाही,
वात्सल्याची त्यांच्या विलसत होती मुखावरी ग्वाही !

¤ ¤ ¤

## ३

तो नयनोत्सव बघुनी सानंद विलोल बापुजी झाले;
गतकाल–वर्तमानीं मन त्यांचें वावडीपरी हाले.

विश्रामाची आई असती तर आज धन्य संसार;
मन त्यांचें तिजसाठीं फिरफिरुनी खिन्न होतसे फार.
ते वसुधेला कितिदा गतस्मृती गहिंवरून कथितात,
तेव्हां वाटे ताजीं सुमनें ते वेंचतात बागेंत !

अनलस सरलाबाई वत्सल, शालीन, कामसू, करुण;
त्यांच्या राज्यांत घरीं मांगल्याची असे जणूं खाण.
ज्या रोपिल्यात वेली अंगणिं त्या होति आज पुष्पवती;
सरलाबाई जणुं या कन्या सुमनांजली तुम्हा देती !

विश्रामाला नाहीं भगिनी तर मानिली नणंद जिला,
ती तुमची प्रिय वेली जाईची आप्त फार वसुधेला.
ती 'स्नेहला' तिज म्हणे, गुज सांगे तिजसि फार संगोपी,
आणिक तिचीच सुमनें तुमच्या प्रतिमेस ती सदा ओपी.
असतां सरलाबाई, तुम्ही असल्या अमोल संसारीं,
घर तुमचें स्वर्गासहि, बगिचा नंदनवनासही भारी !

✲ ✲ ✲

## ४

विश्रामास जिवाचा मित्र असे एकलाच एक खरा,
निशिकांत नांव त्याचें, बाल्यापासुनि सखा नसे दुसरा.
तो प्राध्यापक असुनी अध्ययनीं रत, असे सभा-निपुण,
आणि पदार्थ-रसायन शास्त्रांतिल पंडितचि असामान्य.

निरलस शास्त्राध्ययनीं, संशोधन-कार्यिं मग्न निशिकांत,
प्रिय त्यास बहुत वाटे निसर्गसहवास आणि एकांत.
त्याची प्रयोगशाळा, वसतिस्थलही असे बहुत शांत,
गांवाबाहेरलि त्या छोट्याशा टेकडीवर निवांत.
जवळ निरामय निर्झर खळखळ निज-गीत जातसे गात,
त्याला समीरण करी बाजूच्या उपवनांतुनी साथ.
अतिरम्य उषा तेथें त्याहुनि रमणीय भासते संध्या,
कीं रविला जिंकाया त्या उभया दाविती चिर-स्पर्धा !
दिनभर रसायनाचे प्रयोग करुनी प्रयोग-शाळेंत,
श्रमुनी दिनांत होतां मित्राची वाट पाहि निशिकांत.
तेथें प्रहरभर सुखें सकलांनीं हिरवळीवर बसावें,
होतां उशीर करिते घाई वसुधा म्हणूनच उठावें.
'बापूजी वाट घरीं बघतिल कीं, काय मजसि म्हणतिल ते ?
निर्बंध हिंडणें घर विसरुनि, गृहिणीस उचित नच दिसतें.'
'गृहिणी अशी असावी !' निशिकांत म्हणे मनांत पारखुनी,
बहु गुणवतीच गृहिणी म्हणुनी वसुधेस फार तो मानी.
झालीं पुराण-मूल्यें नष्ट परी आपुल्या समाजांत,
आदर्श नवीं मूल्यें अजुनी दृढ जाहलींच नाहींत.
या संक्रमणामधुनी अंध तसे वाट चालती सकल,
स्वप्रत्ययनेयमती त्यांत किती ध्येयनिष्ठ असतील ?
आयु-र्बल-मति-संस्कृति-लौकिकही वाढवावया झटती,
ऐशीं जीवन-मूल्यें ज्यांचीं असतील ते खरे जगती.

वसुधेची त्यास रुचे नित्याची चालरीत ती चतुर,
मन राखुनि वडिलांचें होई आपण घरांत मान्यवर.

¤ ¤ ¤

## ५

मधुमासीं मध्यनिशीं हिमांशुचें राज्य नील आकाशीं,
नव्हता मेघहि गगनीं, सुखविति नयनास तारकाराशी.
कोठून गंध घेउनि वायू ये रातराणिच्या वरून,
त्यानें पुलकित केलें विश्रामाचें शरीर आणि मन.
तो वसुधेला वदला, 'सुखवी हा स्पर्शुनी मला पवन'
बघ झोंपती लता तरि झोपूं देई न येइ चुंबून.
हा हिमकर उन्मादक ज्योत्स्नेंतुन ओततो प्रणय काय ?
त्यानें प्रमुदित केली म्हणुनी हासे निशा रजत-काय
पण सूक्ष्मपणें बघतां मज वाटे आज हा शशि सचिंत,
कां होय छद्मधारी ? काय असावी तया मनीं खंत ?
ही श्वेत-वसन वसुधा, निशाहि धवलांबरी मनीं भरते,
उभयांत अधिक रम्या कोण अशी भ्रांत कां तया शिवते ?
तो श्लेष मनीं उमजुनि वसुधा रागेजुनी सलज्ज बघे,
बहु रुचली स्तुति म्हणुनी मुरडुनि मग मान ती मनांत रिघे.
स्फुरलें 'इःश' सहज तें स्वभाववच, मृदुतरंग मनिं येई,
'विश्रामसखा ऐसा पति मिळण्या भाग्य लागतें बाई !'

तिज त्या सुख-क्षणीं सुखनिद्रा आणी सुवास सुमनांचा,
मधुयामिनी, मधुरवच, मधुतर सहवासही प्रियजनाचा.

मोरपिसांचा अभिनव हिंदोळा बांधिला कुणि नभाला ?
मदन-रती वर बसुनी झोंके घेती असें दिसे तिजला.

एकतरी तोडावें ख-पुष्प तें म्हणुनि मदन आवेगें,
घे वाढवून झोंका, तोल सुटे परि न येइ तो मागें.

तों एक करा आलें नक्षत्र परी तुटोनि हिंदोल,
अदृश्य मदन झाला रतिचाही मागुनी सुटे तोल !

दचकून उठे वसुधा, अस्फुटशी हाक देइ 'विश्राम,'
स्वप्न अघोरचि बाई, ती आधी शयनिं शोधि विश्राम.

भयभीत फार झाली ऊर धडाडे तिला न तें साहे,
हुरहूर मना लागे, स्वप्न पडावें विचित्रसें कां हें ?

नंतर उरल्या रात्रीं वसुधा क्षणमात्र झोंपली नाहीं,
दुसरे दिवशीं नाहीं कोणापाशीच बोलली कांहीं.

मन खंत करी कांहीं गोड न लागे सुचे न घरकाम,
दिवसेंदिवस तिला मग कांहीं केल्या गमे न आराम.

बापूजींना चिंता वाटुनि त्यांनीं उपायही केले,
पण अनुभवी स्त्रियांनीं निदान त्याचें अचूक तें केलें.

गर्भवती वसुधेला त्या म्हणती लागलेत डोहाळे,
त्याचें स्त्रियांत असतें कौतुक किति, वर्णिल्याविनाहि कळे !

✲ ✲ ✲

‘ चिंव-काव ’ रव करोनी बापूजी खुळखुळाहि वाजविती,
‘ भो भो, हम्मा आली, ’ ऐसें म्हणुनी कुणास खेळविती ?

हा बालक वसुधेचा ‘ प्रमोद ’ याचें असोनि नाम कधीं,
बापूजी परिहासें ‘ प्रमाद ’ म्हणुनि तया पुकारीती !

तो सप्तमास वाढुनि आतां खोड्या करावया लागे,
बापूजींच्या जवळीं असतां त्यांच्या मिशा धरुनि बिलगे.

‘ चोरा ’ म्हणुनी देती चापट-पोळी कधीं हळू त्याला,
धम्मकलाडूहि तसे सेवुनि तुंदील-काय तो झाला.

घे वसुधे, याला हा तनय तुझा श्रमवि गुंड बहुत मला,
यानें अनर्थ केला बघ करुनी विधि मदंक भरवीला.

वसुधा धावत आली, हंसली गालीं, करायचें काय ?
‘ आणि गुलामा कां रे, दुसरें नव्हतें ठिकाण तुज काय ? ’

‘ ते बघ तिकडुनि आले कोण ? ’ ‘ जरा घ्यायचे गडे याला. ’
बघतां त्रिश्रामाला तो तिकडे झाप टाकुनी गेला.

वसुधेस असायाचें सकाळचें घाइचेंच घरकाम,
तोंवर मग सांभाळी प्रमोदला अल्पकाळ विश्राम.

यापरि पिता, पितामह, माता यांचे करांत लडिवाळ,
हा बाळ लळा लावी सकळां, याची नसेच आबाळ !

¤ ¤ ¤

७

घर वसुधेचें कैसें ? यावें पाहून चार चौघांनीं,
मनही तिचें कसें तें खुशाल घ्यावें परीक्षुनी त्यांनीं.

‘ झाला चहा बरें का ? ’ प्रातःकालींच हांक ये कानीं,
विश्राम–बापुजींना परिचित होती तिची मधुर वाणी.

रोज सकाळीं जावें दोघांनीं तीच हांक ऐकून,
सैंपाकघरांत, जिथें थाटाचें मांडिलें चहापान.

तो नाद कपबशांचा मंजूळचि फार बापुजी म्हणती,
पण विश्राम मनिं म्हणे रुमझुमती बांगड्या सुमधुर किती !

नमुनेदार तिचें तें पाहुनि सैंपाकधाम झकझाकित !
बारीक टापटीपहि रचना नामी कुणा न करि चकित ?

तें मंदिर वसुधेचें तिजमागुनि रांगतो प्रमोद दत,
ऐशा थाटांत तिथें रोज तयांचें बसे चहा-त्रिकुट.

विश्रामानें कांहीं रंजनपर वृत्तसार वाचावें,
त्यावर होउनि चर्चा, सकलांनीं नवल करुनि हांसावें.

अपघात विमानांचे येती छापून वृत्त-पत्रांत,
वसुधेचें मन चरके, विश्राम तया नसे जुमानीत.

उड्डाण विमानाचें – ती विद्या त्यांस मोहिनी घाली,
वसुधेसाठीं होई जीव तयाचा परंतु वरखालीं,

जीवित-घातक साहस करायचें नच कधीं अशी आण,
वसुधेपाशीं त्यानें लग्ना-आधींच घेतली जाण.

परि नित्य नवें साहस ऐके वसुधा सचिंतचि पतीचें,
छंद नव्हे, व्यसनाचि हें, वाटे वसुधेस फार भय त्याचें.

'सत्तर वेगानें मी आज फटफटी पथांतुनी नेली,
चाळिस फुटावरोनी आज उडी घेतली अथांग जळीं.

तो पाटिलबोवांचा घोडा मी आज वेठिला धरिला,
बेटा ऐकत नव्हता कोणाला रिंगणांत तो धरिला.

अश्वारोहण अथवा शीघ्रगती फटफटीवरी जाणे,
जाणे सकल कला तो, तोलाया जीव त्यापुढें नेणें.

ईर्षा त्यास बहु असे कीं कांहीं वेगविक्रम करावा,
अपुल्या चापल्यानें बहुलौकिक भारतांत मिळवावा.

परिचित जवस्पृहा तिज विश्रामाची अघोर भारीच,
त्याला अटक नसे तर घातक होईल एक दिन तीच !

¤ ¤ ¤

## ८

बापूजींची जागा ओटीवरची असेच ठरलेली,
दारासमोरची ती, तेथें ते काल मोजिती बसुनी.

म्हणती अमुचें आतां या जगतीं काम राहिलेंच नसे,
जीवन आहे तोंवर जगणें, याहून अधिक कार्य नसे.

संतोष फार होतो वसुधा करिते अमोल ही सेवा,
संकोच परी होतो कोठवरी त्रास तिजसि हा द्यावा ?

बापूजी आतांशा दिसताती फार फार थकलेले,
नेम नसे कीं केव्हां पडेल हें पान गळुनि पिकलेलें.
म्हणती आनंदाचा वसुधेचा पाहिलाच संसार,
यापुढतीं न जगावें श्रेयाचें गाठलें असे शिखर.
येई निशिकांत घरीं तेव्हां ते त्यास वदति चिंतेनें,
‘ विश्रामाची वृत्ती आहे अवखळ, तयास सावरणें.
वसुधेस सुप्त चिंता नित्य तयाची असे, न दावि जरी,
आहे सोशिक भारी, कळ दाबुनि अंतरीं हंसेल वरी ! ’
निशिकांताचा होता बापूजींना तसा विशेष लळा,
विश्रामापरि त्यासहि मानीती तनय ते दुजा अपुला.
द्वादश सालांमागिल आठवला त्यांस काल बाल्याचा,
त्याची स्मृतीच आतां, पुनरपि तो काल नाहिं यायाचा.
विश्राम आणि त्याचा शाळकरी परम मित्र निशिकांत,
विदित न बालमनाला क्रीडेविण अन्य त्यांचिया प्रांत.
आवड निशिकांताला विद्येची, अधिक लक्षही त्यांत,
त्याच्या मतिमत्तेची स्पर्धा कोणी करूं शकेनाच.
अध्ययनीं नित त्यानें अमित पुसाव्या गुरूस घनशंका,
त्याची प्रज्ञा दिपवी मतिहीना, संपदा जशी रंका.
कल्पकधीसम त्याचें संशोधन–छंदही दिसुनि येती,
होणार खास पुढती शास्त्रज्ञचि थोर हा कुणी म्हणती.
विद्येपरि सौजन्यहि, त्याच्या प्रिय सकलही गुरूस कला,
तो त्यांसी निजकौशल दावी, ते वानिती गुरू सकलां !

मराठी ग्रं[illegible] ठा[illegible]. स्थलप्रत.
अनुक्रम 23636 दि: 3/10 १० : ११

विश्राम भिन्न त्याहुनि खेळगडी ख्यातनाम नेकीचा,
तो प्रिय यास्तव सकलां, झालासे मानबिंदु शाळेचा.
क्रीडास्पर्धेमाजी विजयी कप्तान तोच सतत असे,
नित्याहुनी अधिकाचि तो खेळांत विलोभनीय खचित दिसे.
क्रीडानैपुण्याच्या ढाली, पदकें असंख्य सदनांत,
आणिक छायाचित्रें येती छापून वृत्त-पत्रांत.
बापूजींनीं जपुनी होतीं तीं ठेविलीं स्वतःपाशीं,
किति काळ करी वसुधा त्याचें कौतुक मनांत अपुल्याशीं!

* * *

## ९

शालेय शिक्षण पुरें होतां विश्राम बापुजीस म्हणे,
'वैमानिक व्हाया मज आवडतें, मी शिकेन यत्नानें.'
विश्रामाची जाणुनि आवड नी हट्टही तसा फार,
बापूजींनीं त्याला वैमानिक व्हावया दिला वाव.
सुत एकलाच यास्तव वाटे त्यांना मनांतुनी चिंता,
परि साहसी सुताचा वाटे अभिमानहि तया मोठा.
त्याच्या वीरश्रीला मायेच्या कुंपणांत अडवावें,
हें नच रुचे तयांना, म्हणती शुक पंजरीं न कोंडावें.
बापूजींचें त्याला प्रोत्साहन पितृ-योग्य तें मिळतां,
विश्राम कुशल झाला वैमानिक दोन साल मग सरतां.

चिंताजनक तयाचा व्यवसाय – सदैव ही व्यथा घोर,
ग्रासी वसुधेस परी, त्यानें ती होतसे विकल फार.
वरुनी हांसे ठेवी आनंदी घर सदैव ती अपुलें,
परि अंतरीं भयानें चिंतेनें एकसारखीच झुरे.
विश्राम नसे सदनीं, निद्रेवाचून हो निशा सरली,
ऐसे होय कितिकदां, वसुधा त्या काळजीमुळें सुकली.
विश्राम नसे सदनीं, नैमित्तिक सणहि गोड नच लागे,
न रुचे मिष्टान्नहि तिज, वसुधा होई निराश त्या योगें.
विश्राम नसे सदनीं, थाट करावा स्वयें कुणासाठीं ?
तिज वाटे नटण्याची व्यर्थ करावी कशास आटाटी ?
विश्राम नसे सदनीं, कर्तव्यानें हवेंत तो धांवे,
वसुधेचें कोमल मन त्याचे मागुनि अधांतरी धांवें.
भारी खोड्याळ तिचा तनय परी रमवि चित्त सहज तिचें,
जवळीं घेतांच पळे औदासीन्य क्षणांत वसुधेचें !

* * *

## १०

वसुधेची प्रियतम सखि रजनी येणार आजला म्हणुनी,
उठुनी बहु प्रभातीं वसुधा करि टापटीप निज सदनीं.
थाटाचा हा माझा बघुनी संसार आणि युवराज,
रजनी हरखेल मनीं येतां प्रथमचि सखी-गृहीं आज.

'ऊठ लबाडा, लवकर, नी नी किति वेळ अजुनि करणार ?
सांग बरें कोण घरीं खाऊ घेऊन आज येणार ?
ती मावशी तुझी रे बाळा, तुज पाहुनी पटापट ती,
घेईल किती पापे, बालिश होईल आणि तुजसम ती!'
येणार सखी रजनी म्हणुनी आनंदली किती वसुधा,
वर्षें झालीं असतिल तीन पुरीं तिजसी भेटुनी बहुधा!
लग्नास मात्र आली, त्यानंतर वदनही न दाखविलें,
पण येणार कशी ती ? दूर किती नागपूर हें न कळे ?
यापरि स्तुति मनांतुनि, वाचेनें करुनि कांहिंशी निंदा,
अनुराग राग दावुनि वाट बघे सारखी तिची वसुधा.
अश्वाच्या टापांचा येई इतक्यांत नाद तो कानीं,
वाजे घणघण घंटा, टांगा दारींच थांबवी कोणी.
'ती बघ रजनी आली, आली तव मावशी प्रमोद, पळ,'
धांवे वसुधा पुढती, मागुनि धावे प्रमोदही चपळ!
वसुधेसी भेटाया रजनी येतां विराजते सांज,
उभय सखींची प्रीती तैशी आरक्त शोभली आज!
रजनी अवखळ भारी वृत्तीनें भाबडी तशी धीट,
वर्णानें निमगोरी, स्वरूपरचना असे परी नीट.
मोहवि सहज मनाला ऐसा मंजुळ असोनि रवहि तिचा,
ईषत् बघतांच तिला वाटे लाभो सदैव संग तिचा.
'सांपडलें का बाई, घर आमुचें एकदां?' वदे वसुधा,
आणि बघे तों रजनी संगें निशिकांतही दिसे तिजला.

रजनीस पुसे वसुधा, 'कैसे निशिकांत तुजसि सांपडले ?'
रजनी वदली, 'तेही मुंबइहुनि याच गाडिनें आले.'

'अय्या! विदितहि न मला गेला तुम्ही किमर्थ मुंबइला ?'
अमुच्या रजनीला वा येतांना द्यावयास सोबतिला?
'इश्शः!' वदे रजनी, मग वसुधा सुचवी 'चला सकल आंत,'
निशिकांत वदे, 'जातों, मी आहे आज फार घाईत.'
रजनी कृतज्ञतेनें बघुनि म्हणे, 'त्रास आपणां झाला,'
'छेः छेः कसला!' म्हणुनी निशिकांत निरोप घेउनी गेला.

¤ ¤ ¤

# ११

रजनीस पुसे वसुधा, 'कैसे निशिकांत तुज अनायासें,
गाडींत भेटले वा सायासें शोधिलेस सांग कसे ?'
'दुसऱ्या वर्गाचे गं दोन मुशाफिर डब्यांत एकाकी,
ते एक मी द्वितीया, अनोळखी मन वदावया शंकी.
अर्ध्या वाटेवर ये घाटांतिल थंड वात गाडींत,
पुसलें मज– 'लावूं कां वातायन? अनिल हा करी त्रस्त.'
प्रथम मित मग अपरिमित वदतां पुसलें–'कुठें असे जाणें?'
वदल्यें–'आहे जवळीं पत्ता परि तें ठिकाण मी नेणें.'
सौजन्यानें त्यांच्या गडे समाधान वाटलें मजला,
ओळख पटतां आले येथवरी मजसि पोंचवायाला.

नकळें केव्हां कैसा क्षणांत दीर्घ प्रवास हा सरला,
आल्यें येथें केव्हां, स्वप्नचि वा सत्य तें कळें न मला.'

'बहु बोलल्येंच भलतें' ऐसें वाटून थांबवी बोल;
करुनी विषयांतर मग सखीस रजनी पुसे तिचें कुशल.

बघुनी प्रमोदला ती घेई उचलुनि करांत मग वेगें,
आणि वदे वसुधेला, 'मोहक किति हा असे तुझा सुत गे!'

'नांव तुझें काय?' वदे, 'प्लमोद विच्लाम टिळक', अस्फुटसें;
त्याची पोपटपंची ऐकुनि रजनीस आवरें न हंसें.

बहु काळ सखींनीं मग गुजगोष्टी करुनि दिवस संपविला,
गुंफुनि गतस्मृतींचे झेले आमोद त्यांतला लुटला.

¤ ¤ ¤

## १२

ओळख निशिकांताची झाली दृढ अधिक ती करायातें,
रजनी बहु यत्न करी, वसुधेला सहज समजलें कां तें.

दूर फिराया जाऊं गांवाबाहेर ती म्हणायाची,
कारण ती वाट असे निशिकांताच्या प्रयोगशाळेची.

रजनीची ओढ नवी जाणुनि मग आवरोनि गृह-काज,
वसुधा रजनीसंगें दूर फिरायास जातसे रोज.

वाटेंत कधीं भेटे निशिकांत तदा फुलोनि जाय मन,
रजनीचें किति, पाहुनि वसुधा हासे मनांत उमजून.

आठहि दिन नच झाले वसुधेच्या सदनीं येउनी तिजला,
निशिकांताहूनि दुजा विचार कांहीं शिवेच न मनाला!
निशिकांताची मूर्ती येई नयनापुढें तिच्या नित्य,
आणि तिचें मन बोले त्याच्याशीं मुग्ध भावना अमित.
उदित मनोरथ जिरती, उठती वीचीपरी पुनः वरती,
आशालतेवरीं नव सुमनें आरक्त हांसरी फुलती.
विश्रामाच्या सदनीं येई भेटावयास निशिकांत,
त्या समयाची रजनी पाहतसे एकसारखी वाट.
अल्पहि दर्शन तिजला निशिकांताचें गमे सुखद फार,
अल्पहि भाषण करितां दिवसाचें होय सार्थक अपार.
निशिकांताचें वाटे तिज आकर्षण किती नच पुसावें,
येणार असें कळतां त्रेधा पाहून केवळ हंसावें.
जाई आंत पुनरपी येई बाहेर सावरुनि केश,
चुकलें कांहीं म्हणुनी अवलोकी आरशांत निजवेष.
येतां जातां घेई ती मधुरालाप रागदारीचे,
त्या आलापामधुनी उठतात तरंग प्रेम-लहरींचे.
हळुवार हात फिरवी गातांना सहज कुंतलावरुनी,
तेव्हां वाटे फिरवी वीणेवरुनीच काय कर रजनी.
आलें कोणी वाटुनि पाही डोकावुनीच आशेनें,
न दिसे कुणी म्हणोनी प्रमोदला खेळवी निराशेनें.
निशिकांतांना कैशी अंतरिंची आस ही मम कळेल?
केव्हां मजला त्यांच्या हृदयाचा ठाव नीट गवसेल?

भारीच गहन बाई, कळायचें तें कुणासही न कसें;
विज्ञान शोधितां हे होती शास्त्रज्ञ हृदयहीन कसे ?

¤ ¤ ¤

## १३

रजनीचा मंजुळ रव परिसुनि शेजारिणी तिला भुलती,
त्यजुनी अपुलीं कामें वसुधेच्या सदनीं येउनी बसती.
महिलांचा मेळावा बघतां विश्राम हो उतावीळ,
वसुधेस पुसे, 'पुंगीवाली' ही राहणार किति काळ ?
चल आपण रजनीसह चार दिवस शांतशा स्थळीं जाऊं,
पुसतों निशिकांताला तोही येइल निवांत मग राहूं.
विश्रामाची रुचली सहजचि ही रम्य कल्पना सकलां,
रजनीला तर वाटे, स्वर्गचि भूंवरि न काय अवतरला ?
निशिकांत तिथें असतिल,वदतिल,हंसतिल मनांत वसतिल कां ?
कां त्यांच्या सहवासा मन हें आसावतें मदीय फुका ?
भारीच गहन बाई स्वभाव त्यांचा न ये कळुनि ठाव,
दिसती नयन करारी, परि वचनीं प्रगटती मृदुल भाव.
माझीं गाणीं पडतां श्रवणीं, रमतात, मुदित होतात,
बहु काय वदूं माझी रसना स्तवितात चार चौघांत.
स्मरतें वसुधेपाशीं परवां निशिकांत सहज वदले कीं,
'सौंदर्याचीं गमकें मजला तीनच अपार मोहविती–

अवयवसौष्ठव असुनी शरीररचना असेल कमनीय,
वर्णहि गौर सुमध्यम, रुचे असें मन्मनास सौंदर्य. '
काय नवीनचि बाई स्तुतिची ही रीत साळसूद तरी,
काय खुळी मी ? न कळें मज कां अव्यक्त भावनाच परी ?
प्रमुदित होती माझे ऐकुनि अलाप हृद्य गीतांचें,
कोमल, मुग्ध, सनातन नाद उमटती जयांत प्रीतीचे !
त्यांचे पडसाद बळें दडवुनि जरि ठेविती मनीं खोल,
चतुर स्त्री-हृदयाला त्याची लागेल सहज चाहूल !

✲ ✲ ✲

## १४

कांहीं दिन राहुनि मग जाई गांवास आपुल्या रजनी,
होई ' सुने सुने ' घर वाटे वसुधेस एकल्यावाणी.
वसुधेला खसखीच्या क्षणोक्षणीं होति बहुत आठवणी,
चुकल्यागत होई तिज, वाटे आहे घरांतची सजणी.
बाळास फसवुनि म्हणे, ' ती बघ बाहेर मावशी आली. '
आईचें वच सत्याचि वाटुनि धावे प्रमोद प्रतिवेळीं.
विश्राम म्हणायाचा ' बडबड करिते सखी तुझी भारी,
त्याच्या उलट असे पण अमुचा निशिकांत मौनताधारी.
त्याचे नि तिचे कैसें जमणार मुळीं मला कळें नच तें, '
वसुधा म्हणे–' स्त्रियांची ओळख पुरुषांस काडिची नसते ! '

रजनी दिसते अवखळ अन् आहे फार बोलकी धीट,
परि हृदय तिचें प्रेमळ किती कुणास न कळायचें नीट !
निशिकांतास असावी गृहिणी तर ती अशीच योग्य असे,
व्यासंगी मन त्यांचें व्यवहारी जगत सोडुनीच वसे !
आहे जीवन अपुलें मोठ्या कार्यांस वाहिलें त्यांनीं !
त्यांचा जीवन-हेतू समजेल अशी हवी तया गृहिणी.
निशिकांतांना आहे गृहिणी अनुरूप ही सखी माझी,
तुम्ही हवे तयांचें मन वळवायास, आस ही माझी. '
विश्राम म्हणे ' आपण भलत्या फंदामधें न पडणार
घेतिल पाहुन उभयहि, असती सज्ञान ते पुरेपूर ! '
थट्टेंत यापरि वदे, विश्राम परी मनांतुनी चाही,
निशिकांतास असावी भार्या बहु योग्य नी गुणग्राही !
निशिकांतासी पुसतां लग्नाविषयीं वदायचा नाहीं,
किंवा इतक्यांत म्हणे नाहीं कर्तव्यची मला कांहीं.
त्याच्या मनांतलें गुज त्या योगें नच कळायचें कवणा,
सारे शास्त्रज्ञ असे लहरी असतात कां कळे न कुणा.

☼ ☼ ☼

## १५

निशिकांतानें लिहिला संशोधनपर निबंध एक भला,
तो गाजला चहुंकडे, प्रथम-श्रेणीमधें असे गणिला.

बहु माननीय पदवी भौतिकशास्त्रांत लाभली त्यांस,
यास्तव गौरव त्याचा झाला विद्वत्जनामध्यें खास.
पत्रांतुनी कळविलें रजनीला वृत्त अखिल वसुधेनें,
परि रजनीचें नाहीं लवहि समाधान जाहलें त्यानें.
काय तऱ्हा ही बाई, पाठविलें पत्र आठ दिवसांनीं,
राहवलें तरी कैसें ? दुसऱ्याची कल्पना मुळीं नाहीं.
परि काय दोषहि तुझा वसुधे, वदल्यें न मी तुझ्यापाशीं,
कीं असतां तव गेहीं मन माझें राहिलें कुणापाशीं ?
वसुधे, पुसलें होतें तूं मज मागें, कुठें असे चित्त ?
त्या समयींच तुला मीं कथिलें असतें तरीच बहुत हित.
परि वदल्यें नाहीं कीं तुज तें समजेल सर्व आपसया,
अन् संकोचें मज गे, झाला नाहींच धीरहि वदाया.
निशिकांतानीं माझें मन हरिलें, मीच वा दिलें त्यांना,
आहे त्यांच्यापाशीं खचित परी तें कसें पुसूं त्यांना ?
अज्ञ मला म्हणतिल कीं, त्यजुनी जावें कुठेंहि काय मन ?
किंवा आवडलें तर निज-हृदयीं ठेवितील कां जपुन ?
आहे त्यांच्यापाशीं मन्मन, सोडून मीच चरणाशीं
आल्यें त्यांच्या, कीं ते उचलुनि घेतील खचित हृदयाशीं.
वसुधे, विदित नसे हें तुजला, परि नाहिं काय निशिकांत,
वदले तुजला कांहीं ? अः श ! परी काय ही वृथा भ्रांत ?
माझेंच मन खुळें जर त्यांच्याभंवतीं फिरे अनाहूत,
कां मग वांछावें कीं ते आदरतील आंधळी प्रीत ?

90080
२० : २१

किंवा आवडल्यें मी परि घेती प्रीति काय पारखुनी ?
करिं होय कंकण तया विलोकिती दर्पणांत काय कुणी ?
अथवा पुरी परीक्षा केल्याविण हेमही न घेति बुध,
तर निकषावर आहे मन माझें ठेविलेंच मी शुद्ध.
कुसुमाहुनि कोमल हें मन माझें धवल वर्णही त्याचा,
कीं गुच्छ मोगरीचा, उमटो तुमच्या मनीं ठसा त्याचा.

¤ ¤ ¤

## १६

वसुधेच्या पत्रानें होई रजनी अशांतशी बहुत,
चैन पडेना पाहूं निशिकांताना कसे कदा त्वरित ?
जी ओढ मम जिवाला लागे ती मी कशी कुणा दावूं ?
काय करोनी येऊं तुमच्या जवळीं, कसा विरह साहूं ?
वाटें जावें पुनरपि शीघ्रहि वसुधेकडे करुनि धीर,
भेटावें तेथ तुम्हां मन लोकभयेंच घेइ माघार.
उच्छृंखल बहु म्हणतिल जन मजला, जरि असेन मीहि तशी,
दीप-पतंगन्यायापरि न घडो प्रणय-केलि अग्नीशीं.
मी भेटाया येतां रुचेल वा नच तुम्हांस तें न कळे,
म्हणुनी अवखळ तरिही आवरत्यें माझिया मनास बळें !
आवडती बहुत तुम्हां स्वर कोमल मधुर मालकंसाचे,
तो राग गाउनि तुम्हां सुखवावें परि घडेल हें कैसें ?

भेट न हो, पत्र तरी अभिनंदनपर तुम्हांस धाडावें,
काय लिहावें ? अथवा स्वयें लिहुनि तें स्वयेंच वाचावें ?
रजनी स्वमनीं होई कष्टी बहु मार्ग तिज गमेनाच,
जावें भेटीस्तव वा काय करावें तिला कळेनाच.
केला विचार बहुतचि, मन नाचें परि उडूं शके न तन,
नाम मनोरथ वाया जरि काया नेइनाच वाहून !
वसुधे, तव सदनीं मी कांहीं दिन राहुनी इथें आल्यें,
दिन नच पळचि चपळ ते न कळे कीं मज कसें त्वरित सरले,
विरलें स्वप्नचि, अथवा तेंव्हां गरुडावरी बसुनि काळ
धावे, पण आतां तो बसलासे कासवावरी काय ?
मज न रुचें गे कांहीं, समय न जाई, इथें रमे न मन,
जावें परतुनि वाटे वसुधे, मज आवडे तुझें सदन.
मार्ग तुझा तो साचा संसाराचा, स्त्रियांस सौख्याचा,
हा लोभ शिक्षणाचा, जळो फुकाचा, गतानुगतिकांचा !
पति योग्यसा मिळावा म्हणुनी प्रारंभ शिक्षणा होतो,
अन् आविवाह शिकतां सुविद्य युवतीस योग्य वर नुरतो.
विद्याप्रेमी युवतिस मनिंचें गुज तू हळूंच पुसशील,
मजसह सकल कुंवारी खुलीं दिलें करुनि हेंच वदतील -
पति अनुरूप मिळावा, नवरी त्याची म्हणोनि नांदावें,
सदनीं सौख्य असावें, हें युवती वांछिती मनोभावें.

* * *

सदनीं सौख्य असावें यासाठीं सारखी झटे वसुधा,
पण आतांशा न जडे मन वसुधेचें कुठेंहि तें बहुधा.
विश्रामासाठीं नित चिंतेनें व्यग्र ती असायाची,
आज इथें तर तेथें उद्यां, भ्रमंती अशी सदा त्याची.
एकांतीं शांतपणें अवसर बोलावयासही न मिळे,
प्रेमळ भाषण अथवा संगें जाणें फिरावया न जुळे.
नाहीं बाळासाठीं खाऊं वा खेळणेंहि नवलाचें,
किंवा सदनीं नाहीं आणियलें वसन नविन हौसेचें.
आतांशा हीच तऱ्हा, स्वतःकडेही नसेच लक्ष मुळीं,
येती कधीं कधीं तर, क्लबांत उरकून भोजन अवेळीं.
सारे एके ठायीं – वैमानिक शर्यतींत – अवधान,
व्यवसाय अन्य न सुचे, काय करावें तिलाहि समजे न.
विश्रामाचें जीवन झंझावाता परी सदा धावें,
वसुधेला न कळे कीं आपण गतिमान तरि किती व्हावें !
बापूजी तिज देउनि धीर सदा म्हणति, ‘ दुःख संसारीं
मायेमुळेंच आहे, मायेचे पाश पीडिती भारी.
नियती नेते तिकडे सोडुनियां सांपळ्यास जीव पळे;
मायापाशीं पण हें गुरफटुनी मन वृथाच होरपळे.
संतत सुखी असावें, अपुलें आनंद हेंच रूप असे,
आत्म-प्रत्यय घ्याया शून्य मनाहून अन्य अयन तसे.

संसारीं तें होतें विकृत जें मन विकारवश होतें,
आत्मसुखाला मुकतें, आणि पुनः बंधनांत सापडतें.
नाहीं बाधक कांहीं संसारीं परि ममत्व बाधतसे,
सुख-दुःखाची वीची मायेच्या सागरावरीच दिसे.
लाभानें न भुलावें, व्हावें नाशामुळेंहि न हताश,
हा गीतेचा सोपा, असेच मार्मिक परंतु उपदेश. '
बापूजींचें स्मरुनि वचन जरी ती मनास रिझवितसे,
पण काय कधीं होइल ही चिंता तिजसि नित्य झिजवितसे.
घेई लिहावयाला म्हणुनी ती पत्र एक रजनीला,
तो एकच तिज वाटे विरंगुळा त्रासल्यागत मनाला.

☼ ☼ ☼

## १८

रजनी, आज तुला मी लिहितें हें पत्र फार दिवसांनीं,
तुजविण माझ्या मनिंची चिंता समजूं शकेल नच कोणी.
चार दिवस झाले, हे गेले आहेत दूर दिल्लीस,
आहे विमान-वेग-स्पर्धा महनीय राजधानींत.
इकडून घेतलासे ईर्षेनें शर्यतींत त्या भाग,
आणि तुला विदित असे किती करारी स्वभाव यांचा गं.
अभिमान मला वाटे स्वारीच्या साहसी स्वभावाचा,
आणि हृदयही माझें फुलतें पाहून लौकिक तयांचा.

परि यावेळीं होई अतिकातर मन मदीय काय बरें ?
म्हणतात पापशंकी असे अतिस्नेह तें असेल खरें.
अशुभचि दिसते सारे विचारही येति सतत अशुभ मनीं,
आणि भयानक दृश्यें दिसती ध्यानीं, मनीं तशी स्वप्नीं.
मागें मजला पडलें दुःस्वप्नचि तें पुनः पुनः स्मरतें,
आणिक मन माझें गे भीतीनें गांगरून थरथरतें.
आजवरी न कधीं जी झाली निस्तेज वेल जाईची,
सासूबाईंची ती चारच दिवसांत करपली साची.
न शिवे दुधास वाघ्या, घाली दारीं सदैव येरझरा,
फोटोकडे बघे तो ओटिवरल्या न झोंप घेइ जरा.
कांहीं सुचे न मजला, म्हणुनी मी घेतलें लिहायास,
हें पत्र सखे तुजला, माझेंही शांत मन करायास.
पत्र लिहुनि मग लागे वसुधेला झोंप मध्यरात्रीला,
सौभाग्यावर तिकडे काळानें घातला तिच्या घाला!

☼ ☼ ☼

# १९

दुसरें दिवशीं प्रातःकाळीं निशिकांत धावतचि येई,
वसुधेला भेटाया घाबरुनी व्यथित फार तो होई.
स्पर्धेमध्यें पेटुनि विश्रामाचें विमान कोसळलें,
आणिक त्यांतच त्याचा झालासे अंत हें तिला कळलें!

तें वृत्त ऐकुनि पडे मूर्च्छित वसुधा क्षणांत भूमिवरी;
आकाश कोसळावें तैसा आघात जाहलाच शिरीं !
निशिकांतासी येई गहिंवरूनी दृश पाहवे नच तें;
साहूं न शके तोही सुहृद्विरह उभय होत बंधुतसे !
द्रवुनी निशिकांताचें त्या समयीं गोठलें जरी रुधिर,
असहायता बघुनि परि वसुधेची, घेइ खेंचुनी धीर.
उपचार शीघ्र करुनी सावध वसुधेस सावरुनि केलें;
हळहळुनी शेजारी सत्वर धांवून सांत्वना आले.
बापूजींच्या कांहीं नच जावें वृत्त यांतलें कानीं,
त्यांना सावधतेनें नेई निशिकांत आपुल्या सदनीं.
'वसुधा जाणार असे दिल्लीला चार दिवस तर जावो,
बापूजी तोंवर मग माझ्या खोलीवरी तुम्ही या हो.'
कौशल्यानें त्यानें तेथुनि बापूंस दूर हालविलें,
शेजाऱ्यांनीं येउनि वसुधेला आपुल्या घरीं नेलें.
होता प्रसंग दुस्तर उपाय कांहीं करावया नेणें,
सत्वर यावें म्हणुनी केली रजनीस तार घाईनें.

* * *

## २०

रजनीस तार मिळतां, आली धावत सखीकडे आली,
वर्णूं नये तयांच्या हृदयाची काय हो स्थिती झाली !

शून्य सदनिं वसुधेच्या न धजे पद ठेवण्यासही रजनी,
जावें पुढें कसें तिज भेटाया होइनाच धीर मनीं.
आजवरी वसुधेच्या सदनीं नंदनवनापरी वाटे,
परि आज अवकळा ही शिरली येथें कशी कुटिल वाटे ?
तिज आठवलें कांहीं दिवसापूर्वींच मी इथें आल्यें,
तेव्हां धावत येउनि वसुधे, स्वागत तुवां मुदें केलें.
त्या ठायींच पुनः मी येतां परतून चार मासांनीं,
ही अवदशा दिसावी ! क्रूर विधीची असे किती करणी !
अति मंद पदें जाई थबकत ती हळुच घेत कानोसे,
बाहेर, मधें, आंतहि दिसे न कोणी गमे सदन वनसे !
दारांतच पत्रांचा ढीग दिसे, फोडिलें न एक कुणी;
स्वागत करावया ये पुढती वाघ्याहुनी न अन्य कुणी.
वसुधेची आवडती मनी तिच्या घाशि अंग पायास,
करुनी पुच्छ वरी ती गुरगुरली हळुं नि दीनवाणीच.
शब्दाहुनि बहु वाटे स्पर्श तिला बोलकाच भाटीचा,
कळला असेल का त्या मुक्याहि जीवास शोक वसुधेचा ?
जातां जरा पुढें मग विश्रामाचा दिसे तिला कोट,
भिंतीवर लटके तो एकाकी, पाहवे न रजनीस !
त्याचेखालीं होता प्रमोद खेळत स्वतःसवें शांत,
काय पित्याची माया वस्त्रांतुनि त्या असेल पाझरत ?
ती थबकली तिथें तो प्रमोद येऊन बिलगला तिजला,
'आई, मावशि आली' ! म्हणुनी त्यानें निरोप पोचविला.

तो मावशीस सांगे, ' बघ आई एकसारखी रडते,
कारण बाबा अमुचे गांवाहुनि अजुनि येत नाहींत ते ' !
तोंवर आवरलेला रजनीचा हुंदका सुटे स्वैर,
वसुधेचा हंबरडा येई आंतून फोडितचि ऊर !

¤ ¤ ¤

— वि सा वा —

( उत्तरार्ध )

## २१

काांहीं असो कुणाचें कालाचें चक्र तें पुढें चाले,
आणिक दिवसामागुनि मास तसें सालही निघुनि गेले.
करशील खेद कुठवर विसर गडे भूतकाल तो वसुधे !
गेल्याचा शोक वृथा, आतां सोडून विफल चिंतन दे.
गेला त्यजुनी तुजला अखेर अर्ध्या पथांत विश्राम,
झालें वर्ष तयाला परि न गमे तुजसि अजुनि आराम.
देहाचा होम जरी करशिल तरि ये न कींव काळास,
भाळास हात लावुनि थांबवितां येइ काय प्रळयास ?
विलयास सखा गेला परि त्यानें राखिलें प्रतीक निज,
अगतिक कां मग व्हावें अन्य तयाहून अधिक काय तुज ?

आलें रत्न करीं तें प्रकाशतां प्रगटतील जीं बिंबें,
त्यांच्या प्रभेंतुनी तुज प्रगतीचा पथ दिसेल अविलंबें.
दुड दुड धावत तुजला कांहीं वदण्यास येतसे बघ तो,
वत्स तुझा, वत्सलता परि तूं त्यजितां तुला बघुनि बुजतो.
टिप नयनें, टिप आसूं, भासूं देऊं नकोस दैन्य तया,
सैन्य तयाचें आहे बाहेर उभें निरोप दे तनया.
आईस वदे,–' जातों गांव–शिवेवर पतंग खेळाया,
येइन लौकर, नाहीं करणार मुळीं उशीर परताया. '
इतुके वदुनि निघाला, क्षणभरही थांबला न संमतिला,
थोंपवुनी मातेनें घेउनि चुंबन तया निरोप दिला.
प्रमोद दौडत गेला खेळगड्यांच्यासवें विहरण्यातें,
हरिणेंच बागडावीं, हुदडावीं वासरें असें वाटे.
तन्मयली वसुधा तें साधेंही बघुनि दृश्य नित्याचें,
त्याचें कौतुक तिजला, इतरा नाहींच तें कळायाचें.
स्फुरल्या विरल्या वीची अमित तिच्या मानसीं जशा सरसीं,
काळासवें झगडतां दे कर दैवा! सहाय हो मजसी.

* * *

# २२

नव्हतें वसुधेस कुणी उरलें माणूस एक मायेचें,
म्हणुनी तिची कराया निशिकांत विचारपूस यायाचे.

विमनस्क असायाची, नसायचें भान अशन-शयनाचें,
निशिकांतानें तिजला सांगावें वचन नित्यचि हिताचें.

बापूजी होते दिन कंठित दुःखांत पुत्रशोकानें,
विश्रामानंतर ते निवर्तले झुरुनि एक मासानें.

माहेरचें न कोणी, सासरची लागली अशी वाट,
निशिकांताविण दुसरा वसुधेला आसरा न जगतांत.
एक दिनीं सहज घरीं येई निशिकांत पाहिलें त्याहीं,
कीं आलों जवळ तरी, वसुधेला लागली न चाहुलही.
ही संचितास लावुनि बोल, असे नित अबोल करि चिंता,
कांता नसे परि हिनें विसरावें काय ही असे माता ?
'वहिनी', हांकहि देतां ऐकाया तिज नसे मनःस्थैर्य,
त्यजिली श्रवणाभरणें कर्णानें तेंवि काय श्रुतिकार्य ?
'वहिनी,' पुनः म्हणाला, प्रमोद गेला असे कुठें काय ?
सावध होउनि मग ती सांवरुनी पदर बोलली,-'काय' ?
पण त्यानंतर तेथें लवही निशिकांत थांबला नाहीं;
आला कां ? गेला कां ? वसुधेला समजुनी न ये कांहीं.
घडलें असे कितिकदां चुकुनि अनातिथ्य चुकुनि अवमान,
मानी निशिकांताला तिज वाटे हा गमेल अपमान.

¤ ¤ ¤

२३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्वकमत.
अनुक्रम 23535.... वि: काव्य
क्रमांक ....9793..... नों: दि: 3-1-1950

प्राध्यापक लोकप्रिय प्रथितयशाहि फार होय निशिकांत,
विद्यार्थी युवकांना झालासे माननीय तो बहुत.
व्याख्यानाला त्याच्या विद्यार्थी लोटती अलोट तसे,
इतरेजनही येती, सकलां त्याचा विशेष लोभ असे.
त्याचे खोलीवरतीं विद्यार्थ्यांचा असेच परिवार;
आणि परीक्षेचे ते दिन असती त्यांत घाइचे फार.
त्या योगें नच जमलें जाया वसुधेकडे तयास जरी,
त्याचे मनांत होती सुप्त तिची काळजी सदैव परी.
बहुत दिन न मी गेलों, चिंतेंत असेल यामुळें वसुधा,
कांहीं करुनी आतां जाऊं या तिजकडेच प्रथम उद्यां.
वसुधेचा जीवनपट त्याच्या नयनापुढें असे सतत,
लग्नापासून तिच्या तो अवलोकीतसे तिला नित्य.
पूर्वायुष्यामधल्या आठवणी त्या मनांत बंदिस्त
करुनी त्यांची ठेवी टिपणें दैनंदिनींत निशिकांत.
बहु आदरें बघे तो तिच्याकडे, ओढ घेइ मन सुप्त;
संमिश्र भावनांनीं त्याचें मन तिजवरी असे जडित.
साधें अकृत्रिम तें जीवन मोहक अतीव वसुधेचें,
त्याच्यापुढती राही सदैव आदर्श तेंच गृहिणीचें.

☆ ☆ ☆

वसुधेला भेटाया येई निशिकांत नित्य आतांशा;
नव्हती दुसरी कांहीं जगण्याला या जगांत तिज आशा.
नैराश्यधूम जेव्हां झांकी सूक्ष्म स्फुलिंग आशेचे,
त्याच्या उपदेशानें, पवनानें तेंवि तें फुलायाचे.
निशिकांताचा वाटे त्यायोगें तिजसि सुखद सहवास,
अगतिक मनास दावी त्याचें वच जीवनीं नवी आस.
कॉलेजांतिल शिक्षण तो तिज सांगे पुरे करायास,
देई सहाय ईप्सित, कीं न घडो तिजासि बहुत सायास.
निशिकांताच्या योगें वसुधेला गवसली नवी वाट,
आणि नव्या स्फूर्तीनें ती जीवनपथ पुनः क्रमी नीट.
कितिदां निशिकांताचे ती मानी प्रकट फार आभार,
वाही कृतज्ञतेचा मनांत ती एकसारखा भार.
कॉलेजांत शिकावें, जावें कैसे परंतु या विपदीं,
प्रथम दिनीं तिज वाटे जावें परतून मागच्याच पदीं.
धीर करोनि परंतु वसुधा सरसावली, पुढें शिकली,
निशिकांताची तिजला पुसूं नये मदत ती किती झाली.
अभ्यासा समय नसे, प्रमोद खोड्या करायचा फार,
यास्तव निशिकांत तया जाई घेउनि फिरावया दूर.
दुर्बोध विषय तिजला तो समजावुनि कधीं कधीं सांगे,
आणिक सहाय आर्थिक—तेंही त्यासाचि करावया लागे.

त्याच्या औदार्याचा वाटे संकोच फार वसुधेला,
निशिकांताला वाटे परंतु कर्तव्यभाग तो अपुला.
परवां निशिकांतानें भेट दिली आणुनी नवी साडी,
वसुधेला आवडली, संकोचें परि न मोडिलीहि घडी.
झटतात किती बाई, निशिकांत मला करावयास सुखी,
नैराश्य घालवाया माझें करितात आणि यत्न किती.
वसुधेस म्हणुनि वाटे रुक्षहि या जीवनांत ओलावा,
येवोत संकटें परि आघात शिरीं खुशाल झेलावा !

¤ ¤ ¤

## २५

प्राध्यापक-समुदायीं असतां निशिकांत एकदां त्याला,
वसुधा भेटायाला जातां विपरीत बोलवा झाला.
कळतां निशिकांताशीं आहे परिचय विशेष वसुधेचा,
घेऊं चला सख्यानों, कानोसा या नवीन घटनेचा.
वसुधेचा सुत असतो निशिकांताच्या घरीं सदा रावा,
आणिक काय पुरावा जन म्हणती याहुनी तुम्हांस हवा ?
निशिकांताचें लाभे वसुधेला जें सहाय या विपदीं,
आतां करितिल कां हो त्याची हे सकल जन तिला बंदी ?
वसुधेला वाटे हा वृथा असा छळ कशास सोसावा ?
वदतिल वदोत जन ते, कर कोणाच्या मुखास लावावा ?

निशिकांताची वाटे धीराची साउली सुशीत तिला,
नव्हता जनापवादें तो अपुल्या सत्पथांतुनी ढळला.
त्याच्या त्या त्यागानें जाई भारून हृदय वसुधेचें,
आहेत सुजन जगतीं, मानी आभार म्हणुनि ती विधिचे.
विटुनि जनातें वसुधा नाहीं बोलायची कुणापाशीं,
होता हृदय जड परी खुलें करावें तरी कुणापाशीं ?
एक सखी रजनी पण तीही शत योजनें असे दूर,
वाढे सहवास तिचा निशिकांताशीं तयामुळें फार.
निशिकातांचे आहे व्याख्यान कुठें असे तिला कळतां,
आतुरतेनें तेथें सकलां आधींच जातसे वसुधा.
दिसतात किती उमदे सभेंत शास्त्रोक्त बोलतांना ते,
वाटे निशिकांताचें बृहस्पतिसवें असेल का नातें ?
वसुधा-निशिकांताचा दृढपरिचय पाहुनी जनीं होई,
कुजबुज ती वसुधेच्या श्रवणीं आतां हळूहळू येई.
कोणी कुत्सित बघती, कोणी बघुनी उगाच हळहळती,
सभ्येतर-जन-रीती वाटे वसुधेस फार जाचक ती.

* * *

## २६

कॉलेजांतिल शिक्षण सरतां व्यवसाय अल्प शोधून,
रजनी रहावया ये मुंबइला नागपूर सोडून.

तेथून नित्य येई पुण्यास ती सहज आठ दिवसांनीं,
रजनी सदनीं असतां वसुधेचा दिवस जातसे पळुनी.
सवयीनें रजनीला प्रमोदचा लागला ळळा फार,
वाट बघे मावशिची तोहि अचुक उगवतांच शनिवार.
जातांना यावेळीं प्रमोदनें हट्ट फारची धरिला,
म्हणुनी रजनी गेली संगें घेऊन त्यास मुंबइला.
दिनभर वसुधेला मग करमेना, छेः उगाच पाठविलें,
केव्हां प्रमोद येइल मुंबईहुनी असें तिला झालें.

जर एकटी बसे ती घरांत, घर खावया उठे तिजला,
म्हणुनी वसुधा जाई शेजाऱ्याचे घरीं विसाव्याला.
झाले बहुत दिन तरी निशिकांतहि नच घराकडे वळले,
किंवा तेही नकळत मुंबइला मागच्यापरी गेले ?
जावें निशिकांतांच्या खोलीवर पाहुनी तरी यावें,
त्यांच्या सहवासानें ते तिजला वाटतीच फार हवे.

दिवसामधुनी एकहि निशिकांताची न जाहली खेप,
ऐसें घडलें न कधीं, चिंता वाटे म्हणून तिज अधिक.
काय बरें चुकलें तें माझ्या हातून, गैरसमज घडे ?
जावें स्वयेंच यावें भेटुनि समजेल न्यून काय पडे.
सायंकाळीं पण या जातां होइल उशीर परताया,
यावें त्वरित परतुनी निश्चय हा करुनि ती निघे जाया.
भेट दिली आबोली साडी ती नेसण्यास काढावी,
किति दिवसांनीं वसुधा आज तनूला नवें वसन लावी !

## २७

निशिकांताच्या सदनीं बहुधा गेली तिथें नसे पण तो,
द्वार खुलें, दीप जळे, म्हणुनि सुनिश्चित असेल सन्निध तो.
‘निशिकांत’, म्हणुनि बाही प्रतिनादाहुनि न अन्य उत्तर ये,
थांबावें तर होई अवेळ, जावें तरी विफळ जा-ये !
निःशब्दता भयानक दारीं वनराजिमाजि अंधार,
केला व्यर्थ अवेळीं, अशा स्थळीं यावयास कां धीर ?
परि आतां कांहीं क्षण थांबावें वाट पाहुनी जावें,
कालक्रमणार्थ जरा मासिक वा वृत्तपत्र वाचावें.
मेजावरतीं कांहीं हस्तलिखित वाङ्मयापरी दिसते,
पाहूं गेली बहुधा तत्सन्निध काय हो असावें तें ?
हस्तस्पर्श करी तों वळचणिला पाल एक चुकचुकली,
कीं वदली ती वसुधे, कां तुजला अवदसाच आठवली ?
वाङ्मय नच तें वसुधे, घेउं नको कर्मकांड तें हातीं,
आजवरी राक्षियलें तें गुज आतां पडे तुझ्या हातीं.
हृद्गत निशिकांताचें त्यांत असे तें तदीय दिनचरित,
ठाव तयाचा नव्हता आजवरी तुजसि लागला नीट.
मुखपृष्ठावर लक्षी—वसुधे, हें अर्पिलें तुला लेणें,
त्यानें ती सकुतूहल अवलोकी शीघ्र आंतलीं पानें.
ऊर धडाडे कां गे विकसित कां नेत्र कां सुटे धीर ?
कां बावरीच होशी अगतिक कां लोचनीं तुझ्या नीर ?

विदित तिला कीं आहे निशिकांताचा तिच्यावरी जीव,
परि कल्पवे न तिज कीं तो संकल्पी तिलाच आजीव.
बहु संयम आचरणीं विचारही शुद्ध शीलवंतांचें,
अकलंकित सद्वर्तन विकारवशता–न शील तें त्यांचें.
तो त्याग नि तें प्रेमहि स्वीकारूं काय त्यागुं तरि काय ?
त्यागावें तर शापे, खावें तर बाधतें असें होय.

¤ ¤ ¤

## २८

साश्चर्य विलोकी ती दिनचर्येंतील चाळुनी पानें,
पानें नहि निर्माल्यें, पूजेआधींच वाळलीं सुमनें.
परि परिमल चिर विमलचि रमवि रमेला जिला सुरुचि कांत,
सहृदय सुहृद्हृदय ती लक्षी खलु धीर-रुधिर निशिकांत.
वसुधेच्या लग्नाचा क्षण होता वर्णिला तयांत जिथें,
मन सावधान होतां वसुधेचें हरपलेंच भान तिथें.
सर्वचि जीवन आहे वसुधामय कामिनी नसे अन्य,
परि परदारा म्हणुनी आहे भगिनीसमान ती मान्य.
वसुधे, तव गेहीं मी परवां हें सांगण्यास तुज गेलों,
कीं, माझें तुजवरती – काय न वदतांच मागुती आलों.
धीर न हो वदण्यातें, मन माझें सावरूनि मी घेतों,
मांगल्य तव विलोकुनि न कळत माझ्या मनांत मी नमतों.

३८ : ३९

मज वाटे तुजसाठीं स्वार्थानें हो उदार मन माझें,
आणि असेल तसें तर, नसेंच तें उचित आचरण माझें.
पुसतों पुनः पुनः मी कितिदां माझ्या मनास तुजविषयीं,
भाव विरोधी लढती परंतु सात्विकमतीच हो विजयी !
प्रेम अलोट करावें तुजवरती पण दुरूनि, निष्काम,
प्राजक्ताचें बाजुस बसुनि करावा निवांत आराम.
हेंच असें उभयांच्या प्रेमाचें सत्य आणि शिव रूप,
तेंच असें आत्म्याचें शाश्वत, अविकार, सुंदर स्वरूप.
प्रेमाची आहुति ती बघतां भव्यत्व आकळे न तिला,
भरिलें कृतज्ञतेनें ऊर तरी होइना पुरींच तुला.
राही उभीच तेथें होउनिया मंत्र-मुग्ध मग वसुधा,
काल किती सरला तें तिजला कळलें नसेलहि बहुधा.

☼ ☼ ☼

## २१

तत्समयीं मग येई निशिकांत तिथें समग्र अवलोकी;
भावस्निग्धा वसुधा निशिकांताचें क्षणांत मन जिंकी.
निशिकांत मनीं उमजे प्रसंग येऊं नयेच तो आला,
त्या एकांतीं त्याचें सत्त्व हराया स्वयें स्मरचि आला.
वसुधे ! क्षमा करी मज, स्वकरीं घेऊं नको निखारा तो,
नाशाची सकलांच्या बीजें असती शिवूं तयास नको.

आजवरी जरि कितीदां निशिकांतासह असेच एकाकी,
तरि न मनाला शिवली तिच्या कधीं ती त्रपा तिला झांकी.
अवनत लोचन करुनी संकोचें शरमुनी उभी राही,
स्वकरीं पदरा धरुनी पदनख-संघर्षणें उकरि भूही.
वसुधे ! किमर्थ केलें अनपेक्षित आज येथ आगमन ?
कांहीं कुशल नसे कां ? वद काय बरें दिसे करुण वदन ?
तो स्निग्ध-भाव परिसुनि गहिंवरली राहिनाच मनहि उगी,
गंगा-यमुना आल्या कपोल ओलांडुनी उरोभागीं.
घळ-घळ अश्रूंनीं ती जाणों न्हाणीतसे हृदय तप्त,
काय बरें चुकलें तें नकळुनि जाई समीप निशिकांत.
ती त्यांस वदे, 'इतुकें कां करितां प्रेम योग्यता नसतां ?
काय मृतावर आतां अमृताची शिंपणें वृथा करितां ?'
कर घेई वसुधेचे निशिकांत करांत आपुल्या दोन्ही,
नयनांस नयन देउनि ती त्यासी, तो तिच्याकडे पाही.
काय करावें आतां ? कैसे उत्स्फूर्त भाव लपवावे ?
कैसें मन मारावें ? कोणी कोणास काय बोलावें ?
भावोत्कटतेनें मग वच थांबे मूक जाहलीं वदनें,
अंतर देहामधलें सरलें होतांच एकजीव मनें.
कर वसुधेनें अपुलें निशिकांताच्या गळ्यांत गुंफियले ?
तेंव्हां वनराजींनीं बहु गहिंवरुनी दवाश्रु सिंचियले.
आलिंगुनि वसुधेला निशिकांतानें करांत सामविले,
हुंगुनि शिर फिरवुनि कर पाठीवर, अति समीप तिज केलें.

त्या मृदुल स्पर्शानें वसुधेला भान राहिलें नाहीं,
ठेवुनि निशिकांताच्या वक्षावर मान ती उगी राही.
मदना ही बघ तुजला आली चालून आसुरी संधी,
शृंगारुनि मन मदनें मग त्यांची हारिली विवेचक धी.
त्या रात्रीं वसुधा मग घराकडे परतली अहो! नाहीं.
प्रेमविवश जीवांना विभावरी शीत वायुनें दाही.

¤¤¤

# ३०

निशिकांत झोंपलासें पाहुनि वसुधा उठावया लागे,
परि विलग कसें व्हावें अलगद शय्येवरी फिरे मागें.
उचली निशिकांताच्या बाहूवरुनी हळूच शिर अपुलें,
तों कळलें कीं त्याच्या स्कंधाखालींच केशपाश रुळे.
पदरहि अंगाखालीं, आणि तयाची भुजा कटीभवतीं,
आवळले पाश किती! शिथिल तनू सोडवूं शके न मिठी.
बहु यत्नें मग वसुधा शय्येवरुनी हळूं हळूं उठली,
सुटलीं वस्त्रें धीरही गोळा करुनी तिथून ती हटली.
अंग कशानें झाकूं वस्त्रें ही वाटतात मज अपुरीं,
हतभागिनीस या दे क्षमे! निवारा अतां तुझ्या उदरीं.
काय असें हें घडलें देवा! कांहीं मनांतही नसतां,
कीं मज सुप्त मनाचा माझ्याही ठाव लागला नव्हता?

मी वश झालें नव्हतें मदना, तुज म्हणुनि काय हा डाव ?
निशिकांताच्या रूपें केला माझा असाच पाडाव ?
कंदर्पा ! करुनि असा परि माझा घात काय साधियलें ?
नाहीं मी तुजला रे, निशिकांताच्या गुणांस वश झालें !
प्रेम-स्वरूप आहे परमेशाचें पवित्र मंगल तें,
भक्तीचा अभिमानहि नसे अशा भाविकांस तें मिळतें.
निशिकांत, तुम्हावरिं मी जें केलें प्रेम पूर्ण भक्तिमय,
अद्वैत समस्या ही सुटली, मन एक दोन जरि काय.
जें साधतें तपानें शृंगारानें न साध्य काय बरें ?
चिन्मय ऐक्य घडाया तन्मयता हेंच मूळ तत्व खरें !
स्वर्गांतिल देवांनों ! शास्त्रवचन मज यथार्थ सांगा, या.
द्या निष्ठुर शासन मज, असेन मी पांशुला, नकोच दया.
लोकापवाद वाया वाराया अग्निकाष्ठ सीतेला,
परि राधेला प्रभु-पद,—कवण खरा न्याय मान्य धर्माला ?
या थोर सतीसंगें पण माझी योग्य ही नव्हेच तुळा,
नकळत असे अहिल्या भ्रष्ट तरी शापदग्ध होय शिळा !
तिज दिसली रजनीची मूर्ती नयनापुढें—सखे घात,
केला नकळत मी तव, तूं निशिकांतास मानिसी नाथ.
कां स्मरलें न मला हें ? खचितचि मी जारिणी असे दुष्ट,
दावूं कैसे आतां रजनी, मम वदन हें तुला नष्ट ?
हाय सखी-द्रोह घडे, याला देहांत शासनचि इष्ट,
निश्चय करुनि निघे परि पद देती चालण्यास बहु कष्ट.

घन-घोर तिमिर पसरे बाहेरी अंतरीं तिच्याहि तसा,
या घोर तमामधुनीं आतां मी उजळ मार्ग शोधुं कसा ?
उठती रोम तनूवर, अंग शहारून घाम फार सुटे,
अन् आर्द्र भाळ टिपतां पदरहि कंपित करांतुनी निसटे.
असहाय बघे वसुधा निशिकांताच्या मुखाकडे कितिदां,
काय वदूं ? काय करूं ? कैसी टाळूं नवीन ही बाधा ?
द्यावा निरोप मज, मी जातें तोडून आपुला पाश,
या पुढतीं इष्ट नसे दोघांचा एक पळहि सहवास.
शयनीं दीर्घ उसासा निशिकांतें सोडिला तया समयीं,
जणुं अंतरास त्याच्या वसुधेची हांक छेडुनी जाई.
ती तळमळ बघतां मग उरीं तिच्या हुंदका न सामावे,
त्याची लागुनि चाहुल उठेल निशिकांत तेंहि नच बरवे.
ती बहुबळेंच रोखी म्हणुनी निजबाष्प आपुल्या कंठीं,
आणिक संयम करुनी, लिहुनी ठेवी तिथेंच एक चिठी.
तेथून निघे वसुधा, कोठें जावें परी कळे न तिला,
काळाचा नाच तिच्या भाळीं विधिनें सदैव जणुं लिहिला !

☼ ☼ ☼

## ३१

द्विजरव येतां श्रवणीं जागृत निशिकांत हो उषःसमया,
अर्धोन्मीलित नयनीं स्वकरें पाही तपासुनी शय्या.

न दिसे वसुधा म्हणुनी, इतस्ततः नेत्र चोळुनि विलोकी,
न कळे गेली कोठें स्नेहांकित मन तदा अशुभ शंकी.
कैशी अपरात्रीं ही मजशी, निज भीरुतेसही त्यजुनी,
निघुनी गेली कोठें अनुचित शंका मनांत आणोनी ?
कीं लावुंया कसोटी प्रेमाची म्हणुनि लुप्त होशी तूं ?
घायाळ उरीं घालुनि घावाचि साधेल कोणता हेतू ?
किंवा व्यर्थचि घेउनि आशंका तुजसि लावुं बोल कसा ?
विनयवती, शीलवती, तुजसि अतिक्रम रुचेल हा कैसा ?
कां आलीस अवेळीं काल इथें, मोहिलेंस मन नष्ट ?
तूं नसतां गतरात्रीं झाली नसती उपासना भ्रष्ट !
करुनी अर्ध-तपाची उपासना त्वत्समीप मी यावें,
हें काय दुरित माझें ? काय जगाला निरर्थची भ्यावें ?
स्वमनें विशुद्ध परि जें लोकविरुद्धचि न योग्य आचरण,
सत्यचि, परि लोकभयें विंधावें काय सत्यशील मन ?
कीं जनमन कवळाया आधीं स्वमनास आग लावावी ?
रुद्र-प्रसाद व्हाया मदनाची आहुती तया द्यावी !
दैनंदिनी विलोकी मेजावरि, त्यावरीं फुलें दोन,
अश्रु-स्नात निवेदन ठेवियलें त्या समीप अतिकरुण.
निशिकांतानें सत्वर उचलुनि ती वाचली चिठी आधीं,
अश्रूंच्या मालेंतच हृदयाची गुंफिली तिनें आधि—
' अगतिक वसुधा तुमची जाते सोडुनि तुम्हां प्रयासानें,
शोध नका करुं माझा शोकहि तो आवरा विवेकानें.

आहे एकच माझा भार तुम्हावर, स्मृतीच समजा वा,
वत्स प्रमोद माझा, त्याला तुमचाच आसरा व्हावा.
प्रस्तुत रमला आहे तो रजनी मावशीकडे फार,
राहो सुखांत तेथें, तुमचा त्याला असोच आधार.
आणि असेल खरोखर मजवरती प्रेम तर वचन द्या कीं,
विसरुनि मजला सत्वर लौकिक मिळवाल थोर या लोकीं.
रजनी अनुरूप असे गृहिणी तुम्हास द्या तिला हात,
लाखांत गुणी युवती, तुम्हावरी बहु असे तिची प्रीत.
ही शेवटची माझी आंस करावी पुरी असे शपथ,
जाते क्रमुनी वसुधा भूलोकीचा अखेरचाच पथ !'

¤ ¤ ¤

## ३२

इतुक्या घोर पहांटे वसुधे, जाणार तूं कुठें बाई ?
काय मनांत तुझ्या वद पुसते तुज ही अशेष वनराई.
तूं टाकतांच पहिलें पाऊल वनीं, शुनी अशुभ रडली,
आणि नभांतुनि उल्का भूमीवर त्या क्षणींच कोसळली !
जाणार कुठें निश्चय काय मनीं योजिला असे दुष्ट ?
घोर तमीं अडखळतां न दिसे मार्गहि तुझा तुला स्पष्ट.
झप झप टाकीत पदें, प्रमदे ! स्वजनास सोडुनी जाशी !
प्रगटे नयनीं दर, कर वक्षावर ठेवुनी वनीं फिरशी.

सळसळ आवाज उठे, वाटे झाडींतुनी कुणी येते,
वाऱ्याची झुळुक न ती निशाचराचीच जांभई वाटे !
ती शांतता भयानक घूत्कारानेंच भंग पावे कीं,
जावें कीं परतावें? अविचारें परि पुढेंच पद टाकी.
वाऱ्यानें सळसळती कीं भीतीनें थरारतात तरू ?
शाखाकरचि पसरुनी म्हणती वसुधेस थोपवून धरूं.
किंवा लपवावे तुज म्हणुनि लता कुंज आपुलें करिती,
धरिती छत्र तुजवरी सावरुनी धीर बहु तुला देती.
नव्हती कधींच गेली विश्रामावीण एकली वसुधा,
न दिसो कुणा वराका, म्हणुनी झांकी तिला तमीं वसुधा.
हळहळतात तुझ्यास्तव गगनीं त्या तारका उगाच किती,
परि आकळे न कोणा भूलोकावर सखी तुझी महती !

* * *

## ३३

अपुल्या जड देहाचें ओझें ओढीत चालली वसुधा;
बहु तापदायक सदा होई सदसद्विवेकहानि बुधा !
झालें काय कसें तें न कळोनी चाललें शरीर पुढें,
ती लक्तरें मनाचीं पदरीं बांधून जाय नियतिकडे !
डोईवरती नेते वाहुनि ती काय भार हिमगिरिचा ?
जावें कोठें, नकळे, पद जाती क्रमुनि मार्ग सदनाचा.

कां जावें मी सदनीं सकलांचा व्यर्थ घात साधाया ?
रजनीचा, स्वसुताचा केला मी द्रोह आमरण वाया !
शरमाया मन नुरलें विवेक करण्या नुरे मतिहि मजला ;
मन जळतां, मति मळतां, मी आतां शरण जाउं कवणाला ?
जे पुण्यवंत चुकती त्यांचा उद्धार होय शापानें,
शापिल तरि देव कसा ? त्याचा करपेल शाप पापानें !
नाहीं होणार अतां माझा उद्धार या जगांत जरी,
कां मग व्यर्थ जगावें व्हावें भूमीस भारभूत तरी ?
ऐसा विचार करुनी नच जावें तरि घराकडेच वळे,
जीव-शिवाच्या भेटी टळती, होती, सदैव दैवबळें !
आहे वसुधे, अजुनी कार्य तुझें या जगांत बहुमोल;
तें डावलूं नको गे या पुढती सावरून घे तोल.
जीवन हिंदोल असे, वर नेतां गांठवील तो शिखरें,
नेइल अधोगतीसहि, जगणाराचेंच होय कसब खरें !
जातां सदनीं वसुधा स्वप्न दिसें काय वा तिला सत्य ?
तेथें तिष्ठत होता रजनीसंगें प्रमोद दारांत.

* * *

## ३४

वादळ मनांतलें तें मनांत शमवून बोलली वसुधा—
'आला केव्हां तुम्ही ? वाट विपुल पाहिली असे बहुधा'.

‘ फार समय नच झाला, गाडी आतांच आमुची आली’;
रात्रीच्या गाडीचा दुस्तर बाई नको प्रवास मुळीं !
पहांटच्या या वेळीं वसुधा कोठें फिरून ही आली ?
रजनीला न कळे पण, म्हणुनी वसुधेस ती पुढें वदली—
‘ परि काय पहांटें तूं गेली होतीस गे फिरायाला ?
तेंहि असो; पण आधीं करितें स्वाधीन मी तव सुताला.
बाई, तुझ्या मुलाला दोन दिवस जाहलें, बरें नाहीं;
खंत करी फार तुझी, घेउनि आले म्हणून लवलाही. ’
‘ आई, आई,’ म्हणुनी धांवत बिलगे प्रमोद मातेला;
वात्सल्याचा लोंढा हृदयाचे बंध फोडुनी आला !
बघतां प्रमोदला ती घेई कवटाळुनीच पोटाशीं,
निटिलास चुंबितां परि वसुधेच्या भाजलेंच ओठाशीं !
आरक्त नेत्र दिसती, म्लान वदन, शीघ्र तें श्वसन चाले;
अंगास हात लावुनि बघतां तें अग्निनें तसें पोळे !
चरचर काळीज तिचें हिरकणिनें कांचसे उभे कांपे;
भीतीनें कंप सुटे देवाचें नाम ती मनांत जपे.
झालें एकाएकीं बाळाला काय ? ती मनास पुसे;
बहुधा अजुनी माझ्या दैवाचा खेळ संपलाच नसे !
आधींच पापभीरू मन वसुधेचें छळी तिला फार,
नव आपदा बघुनि मग लावी भाळास ती निराश कर.
ती कवटाळुनि घेई हृदयाशीं एकसारखी तनया,
प्रेमभरें आलिंगुनि प्रमोदची न्हाणिली तिनें काया.

व्यथित दिसे, बहुत रडे, नैराश्यानें बघूनि रजनिकडे,
न वदे कांहिं कुणाशीं बाष्पानें द्रवुनि कंठ वचन अडे.
विदित असे रजनीला स्वसुतावर जीव फार वसुधेचा,
काटा पदीं तयाच्या रुततां हो आर्द्र नयन मातेचा.
तिज धीर देउनि वदे रजनी,–‘ चिंता करूं नको कांहीं,
आणूं प्रभात होतां बोलावुनि वैद्यराज लवलाही.
आणिक निशिकांताना कळतां उपचार शीघ्र करतील; ’
तें नांव ऐकतां परि, बाष्पाचा लोटला नवा पूर !
दीर्घ उसासा सोडी, वसुधा न वदे परंतु वच कांहीं,
रजनीस वाटलें कीं, या वेळीं तिज पुसूं नये कांहीं.

¤ ¤ ¤

# ३५

होतां प्रभात गेली निशिकांताच्या घराकडे रजनी,
परि तेथें विपरीताचि दृश्य दिसे जें नसें मनीं स्वप्नीं.
सरकारी अधिकारी डगलेवाले उभे तिथें चार,
ते आपसांत कांहीं वदती, दिसतीहि फार गंभीर.
रजनी जवळी जातां पुसलें, ‘ बाई अहां तुम्ही कोण ?
आणि वदा जाणतसां काय असामी वसे इथें कोण ? ’
बहु घाबरून रजनी उत्तरली, ‘काय ही नवी विपदा ?
येथें निशिकांत खरे प्राध्यापक राहतात, काम वदा ’.

'अपघात असे झाला बहु घातक त्यांस म्हणुनि परभारें,
रुग्णालयांत आहे पोचविलें, शीघ्र भेटणेंच बरें !
आहे अमुची गाडी त्याच्यामधुनीच आपण चलावें;'
रजनी वदे, 'क्षणभरी वाटेमाजी परंतु थांबावें.'
वसुधेला कळवावा निरोप कांहीं न वा उचित आतां,
सांप्रत नकोच आणिक तिजलागीं वाव्रगी दुजी चिंता.
रजनीला न सुचे कीं काय करावें कुणाकडे जावें ?
आधीं प्रमोदसाठीं वैद्यबुवांना पथांत गाठावें.
सरकारी गाडी मग क्षणभर वाटेंत थांबवून तिनें,
वैद्यास कळविलें कीं, प्रमोदला जा बघाच घाईनें,
डोळ्यापुढें भयानक दृश्यें दिसलीं अनेक अशुभ तिला,
मन चिंती तें वैरी नच चिंती, धीरही तिचा खचला !

* * *

## ३६

मन रजनीचें होतें बहु आतुर भेटण्यास निशिकांता,
परि चिंतेनें होई विकलचि सुकल्या फुलापरी आतां.
अपघात कुठें झाला ? पुसतां कळलें—सकाळच्या वेळीं,
जातां दुचाकिवरुनी नकळत मार्गीं समोरुनी आली,
वेगें दुसरी गाडी, आणिक संघर्ष होउनि तिच्याशीं,
झाला आघात शिरीं, आली मूर्छा क्षणांतची त्यांसी.

वाचनालय ठाणे
१००८०
१० : ५१

रजनीला न कळे पण आज अवेळींच घाइनें कोठें
निशिकांत जात होते ? अजुनी पुरती प्रभातही न फुटे !
काय दिसेलचि आतां जातां रुग्णालयांत दृश्य तरी ?
चिंतेंतच या आली गाडी रुग्णालयाचिया दारीं.
गाडींतुनी उतरतां वदलें कोणी, ‘ चला पुढें नीट,
इकडून इमर्जन्सी वॉर्डाची सरळ जातसे वाट ’.
तो सेवक वदला तें वचन सहज निर्विकार चित्तानें,
परि काळिज रजनीचें कापित गेलें जणों कट्यारीनें.
सेवक चाले पुढती, ती चाले मागुनी प्रयासानें;
इतक्यांत आडवें तिज गेलें मांजर मरून वाटेनें.
लावी हात कपाळीं, चरकून मनीं, झणीं पुशी नेत्र;
रजनी चाले पुढती, सेवक बोले, चला इथुनी आंत.
ती स्तब्धता भयानक वदनें गंभीर फार सकलांची,
शय्ये-शय्येवरुनी फिरली दृष्टी क्षणांत रजनीची.
सेवक हलकेंच वदे, ‘ बाई, नंबर नऊ बवा खाट ’;
देवा ! असे क्रमांकहि अशुभ, तुवां काय योजिलें कपट ?

* * *

## ३७

शय्येजवळीं जातां कळलें सावध नसोनि निशिकांत,
परिचारिका उशासी करिती उपचार फार चिंतेंत.

मोठीं कपाळपट्टी, वदना राहूपरीच ती ग्रासी,
डॉक्टर तिला म्हणाले,–'ठेवियलें प्राणवायुवरि यांसी' !
रजनीनें स्पर्शियलें निशिकांताच्या तनूस चिंतेनें;
त्या सुखद स्पर्शानें शयनीं निश्वास सोडिला त्यानें !
डॉक्टर विस्मित झाले, वदले, 'जवळी बसा तुम्ही इकडे;
तुमच्या स्पर्शानें हो कार्य न तें प्राण–वायुनेंहि घडे' !
त्या स्तुतिनें रजनीच्या तनुवर रोमांच उठुनि मन धालें;
देवा ! निशिकांताना आयुर्बल दे, तुला शरण आल्यें !
पुनरपि मग रजनीनें आशेनें स्पर्शिलेंच निशिकांता;
डॉक्टर वदले, 'सावध होतिल बहुधा हळूहळू आतां'.
नव्हतें स्पर्शियलें कधिं निशिकांताच्या तनूस रजनीनें,
सुखवी स्पर्श तिला तो, न्हालें मन जणुं सुधांशु-किरणानें !
अभ्राच्छादित नभसे होते जरि मन उदास रजनीचें,
आशा–मयूर अंतरि चिंतेला मेघ मानुनी नाचे !
तेव्हां निशिकांतानें कष्टानें उघडिले जरा नयन,
अधरहि अस्फुट हलले, परि नाहीं उमटलें पुरें वचन.
त्या चैतन्यानें मग रजनीच्या मोद नच मनीं मावे;
सुकलें वदन विकसलें, देवास नमी कृतज्ञताभावें !
चिंताघन विरतां ये रजनीच्या नयनिं पूर अश्रूंचा,
स्त्री-नयनांत सदोदित निवास असतोच वरुणराजाचा !

रजनीच्या मनिं पुनरपि वसुधेचें स्मरण ये तया समयीं,
जावें कैसें येथुनि कळवावें वृत्त तिज कसें बाई ?
चिंतेंत असेलचि कीं, वैद्यांना धाडुनी परस्पर मी,
गेल्यें कोठें कारण कांहींही कळविलें कसें नाहीं ?
किंवा असेल समजत कीं निशिकांतासवेंच रमली ही,
आणि सदा म्हणते कीं, माझ्या आहेच भोंवरा पायीं !
निशिकांताचें स्नेही आले इतक्यांमधें तिथें कोणी,
त्यांना बघतां आला मग रजनीच्या क्षणांत धीर मनीं.
कांहीं भाषण होतां परिचयही वाढला तिथें त्यांचा,
संकट-समयीं वाटे तिज तो मेळाच देवदूतांचा !
त्यांची संमति घेउनि रजनींनें मग दिली चिठी एक,
नेउनि द्या वसुधेला कृपया ही देशमूखवाडींत !
तोंवर झाला होता मध्यान्ह म्हणोनि डॉक्टर म्हणाले—
‘ यांना स्वस्थ पडूं द्या योग्य नसे येथ थांबणें सगळे. ’
चिंता नुरलीं आतां कळतां परतुनि हळूं हळूं गेले,
स्नेही निशिकांताचें, रजनींविण तेथ नच कुणी उरलें.
जोंवर पाहूं न शके भवतीं निशिकांत नयन उघडोनी,
तोंवर टक लावोनी पाही त्याच्या मुखाकडे रजनी.
ठेवी तृषार्त तैशी नयनीं तें रूप सांठवून किती,
नव्हतीच एरवीं तिज रोखुनि बघण्यास त्याजला शक्ती !

आल्ये कैशी धावत नकळतची येथ ऐनवेळीं मी,
यास्तव परमेशाचे फारचि आभार ती मनीं मानी.

¤ ¤ ¤

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम २-३६३९ वि. काव्य
क्रमांक १४१२३ नों. दि. ३०।७।५६

३९

इकडे वसुधा बैसे घेउनि अंकावरीं स्वतनयास,
वैद्य बजावुनि गेले घडो नये हालचाल मुळिं यास.
गोंवर किंवा विषमज्वरचि असावा कळेल दो दिवशीं,
तोंवर जपणें याला बसुनि असावें कुणीं तयापाशीं.
कोमेजल्या फुलावर नयनांतुनि ठिबकतांच उष्ण जल,
वत्स वदे, 'आई, मज वाटेल बले, लड्डू नकोस बलं';
मावाशिनें सांगितलें पाण्यांत नळावलीं नये जाऊं,
मी ऐकलेंच नाहीं, म्हणुनी झाला असे मला बाऊ'.
ते गोड बोल बालिश करिती बहु मायहृदय आर्द्र मऊ,
चुंबुनि त्यास मनिं म्हणे, 'बाळा तुज सोडुनी कुठें जाऊं?'
आई हसली म्हणुनी प्रमोद आणिक तिच्यासवें बोले—
मंजुळ रव वत्साचे ऐकुनि वसुधा मनामधें डोले.
'मावशिनें मज नेलें ट्राम्बेंत बसून दूर दूर किती!
तेथें होते मोठे हत्ती, वानर नि उंट, वाघ किती!
चौपाटीवर होता समुद्र मोठा, तिथें अम्ही गेलों,
वाळूंत करुनि किल्ले, हवेंत उडवुनि फुगे किती फिरलों!

ओठांस बोट लावुनि वचन सुताचें तिथेंच थांबविलें,
बहु बोलणें न बरवें, राजा! गुपचूप मिटुनि घे डोळे.
वाळूंतलेच किल्ले, आणि हवेंतिल फुगे परंतु उगे,
राहूं देती न तिला, देवा! जीवन असेंच कां अवघें?

¤ ¤ ¤

## ४०

वसुधेच्या फिरफिरुनी गतरात्रीचा प्रसंग येइ मनीं
पाउल चुकलें न घडो त्यायोगें परि विटंबना स्वजनीं!
करुनी प्रसाद मजवरि देवा, बालक तुवां दिलास मला,
अमला मलिनचि झाल्यें, विसर कृपेचा तुझ्या मला पडला!
कल्पतरूचें केलें माझ्या स्वाधीन जरि तुवां रोप,
वरदान सोडुनी मी अभागिनी भाकतें तुझा कोप.
न वदे आई कांहीं म्हणुनी सांगे प्रमोद हळुंच तिला,
लक्ष तिचें वेधाया धरुनी तो हालवी तिच्या हनुला.
मावशिनें सांगितलें, 'समुद्र मिळतो जिथें अभाळाला;
आणि चिऊं-काऊंचे जातात थवे जिथून शाळेला;
तेथें देवाचें घर, आणि वसतसे तिथेंच चांदोबा,
सांग मला पण आई! अपुले आहेत ना तिथें बाबा?'
वसुधेला स्वसुताचे अजाणही वचन शल्यसें रुतलें,
नकळत जणों पडावें व्रणावरीं क्षार तेंवि तिज झालें!

विश्रामाची मूर्ती दिसली नयनापुढें उभी तिजला,
भीतीनें हृदयाशीं कवटाळुनि घेइ माय वत्साला !

न्हता हटला अजुनी ज्वर त्याचा तरि वदे उगाच किती !
त्या बालिश वचनांची वाटाया लागली तिला भीती !

गाणीं गाउनि, हातें थोपटुनी, सांगुनी कथा सुरस,
केला आयास बहुत वसुधेनें झोंपवावया त्यास.

दमुनी झोंपीं गेला अखेर लडिवाळ बाळ वसुधेचा,
इतक्यांत कुणी आलें दारीं घेउनि निरोप रजनीचा.

¤ ¤ ¤

# ४१

त्यानंतर दिन गेले चिंतेमाजीच चार वसुधेचे,
हित न्हतें त्या समयीं त्यजिणें सान्निध्य लवहि बाळाचे.
रजनी निशिकांताचे वसुधेला कुशल येऊनी सांगे,
क्षणभर भेटुनि जाई परतुनि रुग्णालयांत ती वेगें.
वसुधेस वदे,–" बाई ! जगले निशिकांत खचित भाग्यबळें,
सुकृत होतें पदरीं म्हणुनी सेवेस मी इथें आल्यें.
म्हणतात मला, ' घडला सायास तुम्हांस व्यर्थ मजपायीं,'
मज बाई, पण वाटे घडते सेवाच पूज्य या समयीं.
टळलें संकट म्हणुनी भारीच गडे कृतज्ञ ते दिसती,
मृदुभाव अंतरीं अन् कातर नयनीं अधांतरीं बघती.

काल असें झालें कीं बसल्यें होत्यें मुहूर्त शयनाशीं,
तेंव्हां औषध घेउनि आली परिचारिका उशापाशीं.
थबकुनि चावट वदली,–' कटु औषध द्या मधांत मिसळोनी ';
आणिक माझ्या हातीं पेला देऊन निसटली तिथुनी !
मज लाजल्यागत तिनें केलें बाई उपायहीन किती;
औषध मुखीं भरवितां त्यांच्या नयनांत प्रकटलें मोतीं !
डॉक्टर कालच वदले, ' व्रण होइल यापुढें बरा सदनीं,
कोमल उपचारांनीं; द्यावें यांना घरास पोंचवुनी !
डॉक्टर निशिकांतांना मज उद्देशून आणिक म्हणाले,
' सहचारिणी तुम्हाला असे बहुगुणी बघूनि मन धाले ' !
तेंव्हां त्याच्या माझ्या नयनांची जाहली खुली भेट,
वर्णुं कसे शब्दांनीं नेत्रांतिल भावपूर्ण संकेत ? "
यापरि सांगुनि कांहीं कुशल समाचार रोज जायाची,
रजनी येतां तिजला वसुधा मग आग्रहें वदायाची –
' बैस गडे आतां तूं प्रमोद जवळीं क्षणांत मी येत्यें,
बागेंत जाउनि जरा प्राजक्ताचीं फुलें तुला देत्यें.
रजनी, या खेपेला नाहिं तुवां आणिले पुरे कपडे,
तर ही नवीन साडी माझी नेसून जा खुशाल गडे.
आबोली रंग सखे, माझ्याहुनि हा तुलाच फार खुले,
हें वसन तुला राहो.' रजनीचें मनहि त्यावरी जडलें. '
आबोली ती साडी बघतां निशिकांत होय हतबुद्ध,
वसुधेशीं ताटातुटि केली विधिनेंच योजनाबद्ध !

निशिकांताची आतां अपरोक्षचि गाठभेट यापुढतीं,
दंवमिश्रित सुमनें ती हाच जणुं तया निरोप पोंचविती !
रजनी जातां वसुधा निश्चेष्ट बसे करी विचार बहू,
कानीं वदे कुणि,–'नको वसुधे ! भवितव्यदीप तूं विझवूं'!
वात्सल्यभरें मग ती फिरफिरुनी निज सुतास अवलोकी।
गहिंवरुनी मायेच्या पदरानें लेकरास ती झांकी !
तूं दीप तुझी आहे बाळा रे, तेलवात मी मात्र;
तुज तेजस्वी करितां दिवाकरासम, सरेल ही रात्र !

☼ ☼ ☼

## ४२

निशिकांत बरा झाला, रजनीनें घेतलीच पूर्ण निगा,
वाटे वसुधेस बरी रजनी आली सुयोग्यशा समया.
चार दिवस आलेला प्रमोदचा ताप पाहुणा गेला;
बालार्कें जाय धुकें, तैसा सम्मोहही तिचा विरला.
देवानें सोडविलें द्वंद्वामधुनींच दुष्टतर मजला,
मज लाज अतां वाटे गेल्यें मी उलट काय वाटेला ?
निशिकांतांनीं केलें प्रेम जरी मजवरीं न योग्यचि तें,
मीही स्वीकारावें योग्य न, ती विकृतीच मज गमतें !
मन आहे मेणाचें, चेणावें त्यापरीस तें बनतें;
ज्यासि भजावें त्याला नमतें, विरतें, तदाकृती होतें.

माझ्या अंकीं आहे सुत त्याचा भार मी कुणा देऊं ?
कर्तव्यच्युत होउनि दैवाचा रोष मी कसा साहूं ?
पत्नीहुनि माता हें स्त्रीचें कर्तव्य होय अधिकतर !
जग वंदी मातेला, न स्त्रीला, मातृधर्म श्रेष्ठतर !
होइल बालक मोठा, मोठा लावील टिळक टिळक-कुळा;
अजुनी मम भाग्याचा काळ असे यायचा पुढें सगळा !
जें सौख्य मला लाभे बाळाच्या मृदुमिठींत तें न कुठें,
विश्रांत मिळायाचें त्यासाठीं मृतहि माय-हृदय उठे !
वात्सल्य अमृतचि मज, असतां त्याचा झरा अखंड हृदीं,
ईप्सित अन्य न मजला, वात्सल्याचा पडो न खंड कधीं.
वैवाहिक जीवन मम आयुष्यांतील होय इतिहास,
जीवन वाहे पुढती अडवुं नये वाहत्या प्रवाहास !
सरितेच्या मार्गावर येतात गिरी-दरी-स्मशान-रणें,
धर्म-क्षेत्रेंहि तशीं कुग्रामें, उपवनें नि उद्यानें;
धांवे पुढेंच सरिता क्षणही एका स्थळीं न ती थांबे;
दावी सकलांची निज सर्वंकष जीवनांत ती बिंबें !
पापानें न विटाळे, पुण्यानें मात्र होय पावन जें,
उपकारक जीवन मज आदर्श असो सदैव सरितेचें.
जीवन सरितेचें तें जीवनदानार्थ येइ कामास;
आहुतिमय जीवन मम तेंवि असो, प्रेम नाम त्यागास !
मोह असे वंचक हा, सात्विक मति बापडी तयास फसे,
दृढनिश्चय हाच तया वाराया द्वारपाल युक्त असे !

चुकवी विकारवशता, उपाय हितकर विवेक शिकवितसे,
भाव-विवशता विरतां, श्रेयाचा योग्य मार्ग खचित दिसे!

जीवन-पथ आक्रमितां चुकती जन नित्य कितिक भ्रष्टमती,
अनुतापें ते होती पावन, परि जे हताश ते खचती.

जीवन बहुमोल असे सुज्ञानें तें न नासवावें कीं,
पावन करुनी घ्यावें, सेवेनें आठवावया लोकीं!

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ............ दि: ............
क्रमांक ............ नों. दि: ............

## — थोरांचे अभिप्राय —

"... श्री. भवाळकर यांनीं उत्कृष्ट काव्य लिहिलेलें आहे. ऐकत असतांना त्यांतील कल्पनावैभव व रचनाकौशल्य यांचा प्रत्यय सारखा येत होता. एक अगदीं आधुनिक सामाजिक परिस्थिति त्यांनीं सनातन उदात्तांत नेऊन घातली आहे व मोरोपंतांचें अनुकरण केलें आहे. पंतांच्या अनुप्रासांची आवड त्यांच्या ठिकाणीं उत्कटत्वानें दिसून येते. आणि जुन्या नायक-नायिकांच्या अद्‌भुतरम्यतेचें अवगुंठन त्यांनीं नव्या परिस्थितीवर चापून चोपून बसविलें आहे. विषय आणि रीति यांचा हा घडविलेला प्रीतिसंगम आपली रसिकता जर व्यापक असेल तर हृद्य वाटल्यावांचून राहणार नाहीं. तुम्हीं आपलें काव्य प्रसिद्ध करावें असें मीं त्यांना आग्रहानें सांगितलें... मोरोपंतांचे अनुकरण म्हटलें खरें पण पंतांचे दुर्बोधत्व या काव्यांत अणुमात्रही सांपडत नाहीं. सर्वत्र प्रसाद भरलेला आहे."

**— श्री. म. माटे**

" श्री. भवाळकर यांचें 'वसुधा' हें खंडकाव्य मीं एका झपाट्यांत वाचून काढलें. त्यांच्या कथानकाला गति व भाषेला ओघ आहे. पति-पत्नी, सासरासून, पितापुत्र, मैत्रिणीमित्र, मातापुत्र यांमधील उत्कट प्रेमाचीं चित्रें श्री. भवाळकरांनीं हलक्या हातानें आणि हळुवार वृत्तीनें रंगविलेलीं आहेत. त्यात त्यांची उच्च आभिरुचि व रसिकता चांगलीच प्रतीत होते. काव्याचें कथानक उत्सुकता वाढविणारें असून त्यांतून सूचित होणारें 'पत्नीहुनी माता हें स्त्रीचें कर्तव्य होय अधिकतर' हें तत्त्व जितकें उदात्त तितकेंच तें कथानकाला अनपेक्षित कलाटणी देणारें आहे. मुक्तछंदाच्या नव्या जमान्यांतहि जुनी आर्या वापरून श्री. भवाळकरांनीं आपलें कथानक इतकें आकर्षक केलें ही मोठी अभिनंदनीय गोष्ट होय. मराठींत आजवर झालेल्या कथानकप्रधान खंडकाव्यांत 'वसुधे'ला एक वरचें स्थान निश्चित मिळेल यांत मला शंका वाटत नाहीं."

**— डॉ. के. ना. वाटवे**

" कथाकाव्य लिहिण्याकडे आजच्या कवींचा कल नाहीं. कविता म्हणजे आत्माविष्कार आणि तोहि शक्य तितका त्रुटित, असें आजच्या कवितेचें स्वरूप झालें आहे. बारीक पापुद्रा काढून त्याखालीं आढळणारी सूक्ष्म तरल छटा रंगविण्यावर सारा भर! अशा स्थितींत नाहीं म्हणायला प्रा. य. द. भावे यांचें सुमारें दोन वर्षांपूर्वी प्रकाशांत आलेलें 'मीलन' हें कथाकाव्य काय तें अपवादभूत! त्यांतील प्रणयरम्यता आणि जीविताविषयक तत्त्वज्ञान हीं चित्तवेधक होतीं. मात्र त्यांनीं मुक्तछंदाचा आश्रय केला होता. त्यानंतर लक्ष वेधून घेणारें असें 'वसुधा' हेंच कथाकाव्य. श्री. भवाळकरांनीं या काव्यास 'आर्या' वरिली आहे — जिच्या वाटेला आज सहसा कोणी कवी जात नाहींत!

कथा सांगतांना गद्यसदृश रचना, दुवे जोडतांना, येणें अनिवार्य असतें. ती अनिवार्यता क्षम्य आहे हें ध्यानीं घेतल्यास सर्व काव्य सरस झालें आहे. क्रमांक १७, ३२, ४२ अशी स्तबकत्रयी विशेष उल्लेखनीय होय; आणि कथेंतील व्यक्तिरेखा व कथानकाचें पर्यवसान मनोज्ञ वाटतात असेंच वाचक म्हणतील. 'वसुधे'चें गुणवैभव आणि भ्रमण तिचें नांव सार्थ करीत आहेत."

— **यशवन्त दि. पेण्ढरकर**

"श्री. भवाळकर यांचें 'वसुधा' हें खंडकाव्य वाचलें. त्यांनीं स्वीकारलेल्या कथानकांत करुणरसाला बराच अवकाश असून तो रस वाढविण्याचा त्यांचा प्रयत्न यशस्वी झाला आहे. श्री. भवाळकर यांच्या काव्याची भाषा ओघवती असल्यामुळें वाचकाला कुठेंहि सहसा कंटाळा येत नाहीं. श्री. भवाळकर यांना काव्यरचनेची हौस आहे. ही हौस त्यांनीं सतत अभ्यासानें वाढविल्यास कालांतरानें ते चांगले कवि होतील अशी उमेद बाळगण्याजोगे गुण त्यांच्या या 'वसुधा' काव्यांत आहेत."

— **न. र. फाटक**

श्री. अ. श्री. भवाळकर यांचें 'वसुधा' हें खंड-काव्य वाचावयास घेतांना गद्याचें माध्यम सोडून कवितेंत कथा गुंफण्याचा हा खटाटोप त्यांनीं कां केला,

असा मूलोच्छेदी प्रश्न माझ्या मनांत उभा राहिला होता. आजच्या वाङ्मयांत लघुकथेनें जिकडे तिकडे आपला पसारा मांडलेला असतांना एक गोष्ट सांगण्या-करितां एखाद्यानें जाणून बुजून काव्याचा आश्रय करावा याचें नवल वाटणें साहजिक आहे. दैवसेनी, कृष्णाकुमारी, इंदिरा यांसारख्या दीर्घ कथाकाव्यांचे दिवस आतां गेले, चुटपुटत्या भावकाव्यालाच आज भाव आहे, अशी समजूत रूढ आहे. पण ' वसुधा ' हें काव्य जसजसें वाचूं लागलों तसतसा वरील प्रश्न मनांतल्या मनांत विरघळूं लागला आणि काव्य वाचून संपेपर्यंत तो पूर्णपणें नाहींसा झाला हें मी आनंदानें कबूल करतों. लघुकथेनें कितीहि प्रांत जरी आक्रमिलेला असला तरी, काव्यात्मता म्हणून कांहीं एक चीज तिच्या आगळीं शिल्लक राहतेच. प्रस्तुत कथेचें स्वरूपच असें आहे कीं तें काव्यात्म शैलीनें अधिक खुलावें. काव्याची नायिका वसुधा हिच्या संबंधानें तिच्या निर्मात्याला जें सांगावयाचें आहे, तिजविषयीं जो ठसा वाचकाच्या मनावर बिंबवावयाचा आहे तो काव्याचें माध्यम स्वीकारल्यानेंच बिंबवितां आला आहे. श्री. भवाळकरांच्यामधला कवि पुढें सरसावला म्हणूनच वसुधा-निशिकांत यांचें मीलन आणि वसुधेचें उत्तर आयुष्य यांच्याविषयीं करुणा आणि आत्मीयतेचा जिव्हाळा वाचकाच्या मनांत तो उत्पन्न करूं शकला. गद्य लघुकथाकाराला हें साधलें नसतें.

गद्यांतदेखील काव्य येऊं शकतें, पण पद्यांत तें अधिक खुलतें, भावनेची अधिक चांगली पकड घेऊं शकते. खेरीज गद्य कीं पद्य हा प्रश्न लेखकाच्या प्रकृतिधर्मावरहि बराचसा अवलंबून असतो. श्री. भवाळकरांची प्रकृति कविता-नुकूल आहे असा या काव्याच्या वाचनानें मनावर ठसा उमटतो. त्यांची शैली संयमित, भावकोमल आहे. पाल्हाळ, उत्कटता, भडकपणा यांच्यापासून ती अलिप्त आहे. ओघवती वाणीनें वेधक, रेखीव शब्दाचितें रेखाटण्यांत ते कुशल आहेत. त्यांचें हें काव्य म्हणजे कथासूत्रांतें गुंफलेल्या सुंदर शब्दचित्रांची मालिकाच भासते. तें हातांत घेतलें म्हणजे वाचून संपविल्याखेरीज खालीं ठेववत नाहीं. यापेक्षां अधिक शिफारस काय करावी ? ''

— श्री. ना. बनहट्टी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळ
अनुक्रम 23439 दि: ...
क्रमांक 9073 नों: दि: 3-1-70

REFBK-0010040

REFBK-0010040

১০০৪০.

एकमेव विक्रेते :
लाखाणी बुक-डेपो
रामचंद्र बिल्डिंग, मुंबई ४